रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक ३५७
www.ramprahar.com

# राम प्रहर

शनिवार, १५ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

भारतामध्ये गुंतवणूक करा -पंतप्रधान मोदी/२
पेणमध्ये घरफोडी करणारे सराईत चोरटे जेरबंद/५
'यशस्वी' पर्दापण करीत रचला इतिहास!/८

# चांद्रयान-३चे यशस्वी उड्डाण



**श्रीहरिकोटा : वृत्तसंस्था**

**भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्रोचे महत्त्वाकांक्षी चांद्रयान-३ शुक्रवारी (दि. १४) दुपारी यशस्वीरीत्या चंद्राच्या दिशेने झेपावले. या वेळी इस्रोच्या शास्त्रज्ञांसह समस्त भारतीयांनी जल्लोष केला. चांद्रयान-३ हे ४२ दिवसांचा प्रवास पूर्ण केल्यानंतर २३ ऑगस्ट रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्याची अपेक्षा आहे.**





चांद्रयान-३ भारताच्या अवकाश कार्यक्षेत्रात एक नवीन अध्याय लिहित आहे. प्रत्येक भारतीयाची स्वप्ने आणि महत्त्वाकांक्षा उंचावत उंच भरारी घेत आहे. ही महत्त्वपूर्ण कामगिरी आपल्या शास्त्रज्ञांच्या अथक समर्पणाची साक्ष देते. त्यांच्या जिद्द आणि चातुर्याला माझा सलाम!
-नरेंद्र मोदी, पंतप्रधान

**चांद्रयान-३**

*एलव्हीएम3-एम4 रॉकेटद्वारे प्रक्षेपण*

*अवघ्या देशभरात झाला जल्लोष*

*42 दिवसांनी उतरणार चंद्रावर*

*जगाचे लागले मोहिमेकडे लक्ष*



# राज्य मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळातील नवनियुक्त मंत्र्यांच्या खातेवाटपाबरोबरच सध्याच्या मंत्र्यांच्या खात्यांमध्येदेखील काही फेरबदल करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि. १४) खातेवाटप जाहीर केले. राज्यपाल रमेश बैस यांनी मंजुरी दिल्यानंतर हे खातेवाटप जाहीर करण्यात आले आहे.



**◆ मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे सामान्य प्रशासन, नगर विकास, माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, परिवहन, सामाजिक न्याय, पर्यावरण व वातावरणीय बदल, खनिकर्म आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना वाटप न केलेले विभाग राहणार आहेत.**

**◆ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा, राजशिष्टाचार ही खाती असतील, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे वित्त व नियोजन हे खाते असणार आहे.**

## इतर २६ मंत्र्यांची खाती पुढीलप्रमाणे

◆ **छगन भुजबळ** : अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण ◆ **दिलीप वळसे-पाटील** : सहकार ◆ **राधाकृष्ण विखे-पाटील** : महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास ◆ **सुधीर मुनगंटीवार** : वने, सांस्कृतिक कार्य, व मत्स्य व्यवसाय ◆ **हसन मुश्रीफ** : वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य ◆ **चंद्रकांत पाटील** : उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य ◆ **विजयकुमार गावित** : आदिवासी विकास ◆ **गिरीष महाजन** : ग्रामविकास आणि पंचायतराज, पर्यटन ◆ **गुलाबराव पाटील** : पाणीपुरवठा व स्वच्छता ◆ **दादाजी भुसे** : सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) ◆ **संजय राठोड** : मृद व जलसंधारण ◆ **धनंजय मुंडे** : कृषी ◆ **सुरेश खाडे** : कामगार ◆ **संदीपान भुमरे** : रोजगार हमी योजना व फलोत्पादन ◆ **उदय सामंत** : उद्योग ◆ **प्रा.तानाजी सावंत** : सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण ◆ **रवींद्र चव्हाण** : सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)◆ **अब्दुल सत्तार** : अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन ◆ **दीपक केसरकर** : शालेय शिक्षण व मराठी भाषा ◆ **धर्मरावबाबा आत्राम** : अन्न व औषध प्रशासन ◆ **अतुल सावे** : गृहनिर्माण, इतर मागास व बहुजन कल्याण ◆ **शंभूराज देसाई** : राज्य उत्पादन शुल्क ◆ **आदिती तटकरे** : महिला व बालविकास ◆ **संजय बनसोडे** : क्रीडा व युवक कल्याण, बंदरे ◆ **मंगलप्रभात लोढा** : कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता ◆ **अनिल पाटील** : मदत पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन.

## राज्यात ५० हजार शिक्षकांची होणार भरती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात ५० हजार शिक्षकांची भरती केली जाणार आहे. पहिला टप्प्यात ३० हजार आणि दुसऱ्या भरतीत २० हजार भरती केली जाईल, अशी घोषणा शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केली आहे.

जिल्हा परिषद आणि अनुदानित शाळांमध्ये शिक्षक भरती होणार असून निवृत्त होणाऱ्या शिक्षकांकडून काम करून घेतले जाणार असल्याची माहिती मंत्री दीपक केसरकर यांनी या वेळी दिली. याबाबत भूमिका स्पष्ट करताना सेवानिवृत्तीचा घाट घातला नाही, तर भरतीला स्टे लागला म्हणून कंत्राटी शिक्षक घेतल्याचे ते म्हणाले.

# मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडून मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

### पनवेल ते इंदापूर एक मार्गिका गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकणाच्या भविष्याची दिशा ठरवणाऱ्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी राज्यातील सरकार कटिबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी शुक्रवारी (दि. १४) या महामार्गाची अधिकाऱ्यांसह पाहणी केली व आढावा घेतला. या वेळी मंत्री चव्हाण यांनी पनवेल ते इंदापूर पहिला टप्पा हा गणेशोत्सवापूर्वी पूर्ण होऊन एक मार्गिका सुरू होईल, तर डिसेंबर २०२३अखेरपर्यंत पूर्ण महामार्ग सुरळीतपणे सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला.



मंत्रीमहोदयांच्या मुंबई-गोवा महामार्ग पाहणी दौऱ्याला पनवेलमधून सुरुवात झाली. या वेळी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार धैर्यशील पाटील, भाजपचे जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, नितीन पाटील, उपाध्यक्ष राजेश मपारा यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

**(संबंधित वृत्त पान २ वर..)**

## निवडक

### पंतप्रधान नरेंद्र मोदींना फ्रान्सचा सर्वोच्च पुरस्कार

**पॅरिस** : फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फ्रान्सच्या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले. 'द ग्रँड क्रॉस ऑफ द लीजन ऑफ ऑनर' हा फ्रान्सचा सर्वोच्च पुरस्कार प्राप्त करणारे मोदी हे पहिलेच भारतीय पंतप्रधान ठरले आहेत.

### सत्तासंघर्षावर उत्तरासाठी दोन आठवड्यांची मुदत

**नवी दिल्ली** : महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षातील आमदारासंदर्भात दोन आठवड्यांत उत्तर सादर करावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिले आहेत. दरम्यान, माझ्यापर्यंत अद्याप कोणतीही नोटीस आलेली नाही. अभ्यास करून मी यावर पुढील निर्णय घेईन, असे नार्वेकर म्हणाले.

### रायगडचे पर्जन्यमान

**२४ तासांतील पाऊस : २७.३ मिमी**
**एकूण पाऊस : ८७३.०४ मिमी**

# प्रगतीमध्ये सातत्य ठेवा | शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना शिंदे-पवार यांची पंचसूत्री

## सीकेटी विद्यालयात विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वप्न, मेहनत, सातत्य, आत्मविश्वास आणि श्रद्धा या पंचसूत्रीने आयुष्यात सतत प्रगती करा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना शिंदे-पवार यांनी केले. त्या नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयात आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (दि. १३) संस्थेचे श्रद्धास्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या समारंभाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूषविले.

समारंभास रायगड जि.प.चे सहाय्यक प्रशासन अधिकारी अशोक कुकरारे, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, सदस्य संजय भगत, गव्हाण कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, द्रोणागिरी नोड येथील भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काथे, पोयंजे विद्यालयाचे मुख्याध्यापक एल. एल. ठाकरे, **(पान २ वर..)**



### उत्तुंग भरारी घ्या -लोकनेते रामशेठ ठाकूर

समारंभाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना उत्तुंग भरारी घेण्याचे आवाहन केले. स्वप्न पहा, पण अशी पहा की, जी आपल्याला झोपू देणार नाहीत, अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा दिली.

# रायगड जिल्ह्यातील १७ ग्रामपंचायत सदस्य अपात्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

दिलेल्या मुदतीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने रायगड जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींमधील १७ सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. रायगडचे जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी हे आदेश दिले आहेत.

ग्रामपंचायतीमध्ये उमेदवार ज्या जाती संवर्गातून निवडणूक लढवतात त्या जातीचे वैधता प्रमाणपत्र निवडून आल्यानंतर एक वर्षाच्या मुदतीमध्ये सादर करणे बंधनकारक असते, मात्र २०१९, २०२० आणि २०२१ या कालावधीत झालेल्या विविध ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांनी मुदतीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यामुळे नियमानुसार जिल्हाधिकारी यांनी अशा सदस्यांचे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द केले आहे.

कर्जत तालुक्यातील तिवरे ग्रामपंचायतीमधील एक सदस्य, माणगाव तालुक्यातील पाटणूस आणि तळाशेतमधील दोन सदस्य, रोहा तालुक्यातील चिंचवली तर्फे आतोणे ग्रामपंचायतीमधील एक सदस्य, न्हावे ग्रामपंचायतीमधील पाच सदस्य, तर ऐनघर ग्रामपंचायतीमधील एका सदस्याचे सदस्यत्व रद्द झाले आहे. त्याचप्रमाणे म्हसळा तालुक्यातील तुरुंबाडी ग्रामपंचायतीमधील तीन सदस्य, पनवेल तालुक्यातील दुंदरे ग्रामपंचायतीमधील एक, मुरूड तालुक्यातील बोर्ली मांडला एक आणि उरण तालुक्यातील नागाव येथील दोन सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे.

# खारघरमध्ये उद्या मिलेट पाककला स्पर्धा व मार्गदर्शन

### जगप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांची लाभणार उपस्थिती



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड महिला मोर्चाच्या वतीने रविवारी (दि. १६) दुपारी ३ वा. खारघर येथे मिलेट (भरड धान्य) पाककला स्पर्धा व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आयटीएम कॉलेज येथे होणाऱ्या या स्पर्धेस जगप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांची उपस्थिती लाभणार आहे.

कोणत्याही पदार्थाची चव ही तो पदार्थ बनविणाऱ्याच्या हाताची असते हे जितके खरे तितकेच हेही खरे की पदार्थ बनविणाऱ्याच्या मनातून ती चव पदार्थात उतरते. पाककला म्हणजे रूचकर, चविष्ट आणि पोषक पदार्थ बनविण्याची कला किंवा शास्त्र आहे. ही कला जमायला या कलेचा गोडी लागायला हवी व त्याचा ध्यास घ्यायला हवा, कारण कोणताच पदार्थ एकदा करून त्यात प्राविण्य मिळवता येत नाही. तो जेव्हा पुन्हा पुन्हा केला जातो त्याचवेळी त्यातील बारकावे लक्षात येतात आणि मगच तो प्रत्येकवेळी उत्तमोत्तम बनत जातो. त्या अनुषंगाने या पाककला स्पर्धा आणि विष्णू मनोहर यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी आयोजक संध्या शारबिद्रे (९९८७८५१४८४) किंवा साधना पवार (७०२१५०१००८) यांच्याशी संपर्क साधावा.





**पनवेल : सध्या सर्वत्र जोरदार पाऊस पडत आहे. या पावसात गटार तसेच रस्त्यामध्ये पाणी तुंबून नागरिकांना कोणत्याही समस्येला सामोरे जावे लागू नये यासाठी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी तळोजा, पापडीचा पाडा या परिसराची अधिकाऱ्यांसह पाहणी केली तसेच त्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, पापा पटेल, प्रभाग क्रमांक ३चे अध्यक्ष मुनाफ पटेल, केंद्र प्रमुख छबी पटेल, निर्दोश केणी, इस्माईल पटेल, जुनित खान, अजित दिवाले, महापालिकेचे सहाय्यक आयुक्त वैभव विधाते, वॉर्ड अधिकारी जितू मढवी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.**

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून पनवेलमधील वाजेत साकारणार गणपती घाट

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील वाजे येथे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीमधून गणपती विर्सजन घाट बांधण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १४) झाले.

पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे अनेक विकासकामे होत आहेत. याच अनुषंगाने त्यांच्या निधीतून वाजे गावात गणपती विसर्जन घाट बांधण्यात येणार आहे. या कामाच्या भूमिपूजन समारंभास पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, वाजे ग्रामपंचायतीच्या सरपंच मथुरा पाटील, उपसरपंच गणेश पाटील, हभप यशवंत पाटील, माजी सरपंच राजेश भोईर, रेवण पाटील, राजेंद्र भालेकर, राघो पाटील, वाजे सदस्य शाम भालेकर, रुपेश भोईर, अनिल भोईर, पदू वाघ, विजय पाटील, अंकुश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या कामासाठी आठ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

दरम्यान, रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाच्या सदस्यपदी राजेश भोईर यांची निवड झाल्याबद्दल या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कशेडी घाट भुयारी मार्गाची एक लेन लवकरच सुरू

## सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांची ग्वाही



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर येत्या गणेशोत्सवामध्ये एका मार्गिकेवरून वाहतूक सुरू होण्यासाठी काँक्रीटच्या रस्त्यावर किमान १२ तास पावसाचे पाणी पडू नये, यासाठी ताडपत्रीचे छप्पर उभारून सुरू केलेल्या प्रयत्नांचा संपूर्ण महामार्गावरील काँक्रीटीकरणादरम्यान वापर करण्यात येईल. यामुळे केंद्रीय भुपृष्ठवाहतूकमंत्री ना. नितीन गडकरी यांच्या आश्वासनानुसार येत्या डिसेंबरपर्यंत महामार्गाचे काम वेगाने पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी शुक्रवारी (दि. १४) कातळी भोगाव येथील भुयारी मार्गाला भेट देताना दिली.

या वेळी माजी आमदार धैर्यशील पाटील, माजी आमदार डॉ. विनय नातू, माजी नगराध्यक्ष सुरेखा खेराडे, रवींद्र नागरेकर, अनिकेत पटवर्धन आदी तसेच राष्ट्रीय महामार्ग तसेच राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, पेणचे कार्यकारी अभियंता तसेच भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी एल अॅण्ड टी आणि एसडीपीएल या ठेकेदार कंपन्यांचे इंजिनियर्सदेखील दौऱ्यामध्ये सहभागी झाले होते.

मंत्री चव्हाण यांनी भविष्यात कोकणातील एक्सप्रेस वे म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या पोलादपूर ते खेडला जोडणाऱ्या कशेडी घाटातील नऊ किमी अंतरावरील १८०० मीटरच्या भुयारी मार्गाची पाहणी केली. गणेशोत्सवात मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्याय असणारा बोगदा वाहतुकीसाठी सुरू करण्याच्या दृष्टीने युद्धपातळीवर काम करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. पर्यायी मार्ग म्हणून कशेडी घाटातून गेली दोन वर्षे बोगद्याचे काम सुरू होते. त्यापैकी एका बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. बोगद्याच्या आतील रस्त्याचे काँक्रेटीकरणाचे काम सुरू आहे.

या कामाची पाहणी मंत्री चव्हाण यांनी केली. काँक्रीट रस्त्याला पाणी लागल्यास सिमेंट वाहून जाऊन रस्ता खराब होतो त्याचा दर्जा ढासळतो. ही बाब लक्षात घेता तंत्रज्ञानाचा वापर केल्याचे मंत्री चव्हाण यांनी सांगितले. नव्या बोगद्यामुळे कशेडी घाट ते रायगड जिल्ह्यातील पोलादपूर हे अंतर अवघ्या दहा मिनिटांत पार होणार आहे. हे अंतर पार करण्यासाठी अवघड वळणांमुळे जवळपास २० ते २५ मिनिटांचा कालावधी लागतो. त्यात बचत होणार आहे.

ना. चव्हाण यांनी कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गाच्या अॅप्रोच रोडची पाहणी करून भुयारी मार्गाने तालुक्यातील आंबेनळी आणि कशेडी घाटातील तसेच खेड तालुक्यातील कशेडी आणि परशुराम घाटरस्ता खचत असल्याकडे माध्यमांच्या पत्रकारांनी ना. चव्हाण यांचे लक्ष वेधले असता नैसर्गिक आपत्तीबाबत तत्पूर्वी उपाययोजना होत नसून याठिकाणी आपत्तीनंतर तातडीने घाटरस्ता मोकळा केला जात असल्याची माहिती देताना घाटरस्त्याचे नूतनीकरण आणि सक्षमीकरण करण्याची गरज असल्याचे मान्य केले. पोलादपूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पूर्णाकृती पुतळयाजवळ पोलादपूर तालुक्यातील काही सामाजिक कार्यकर्ते तसेच पोटठेकेदारांनी ना. चव्हाण यांचे स्वागत केले.

# पक्षपात करणाऱ्या अधिकाऱ्यांना घेराव घालू

## आमदार गणेश नाईक यांचा नवी मुंबईतील बैठकीत इशारा



**नवी मुंबई : बातमीदार**

जनतेची कामे करताना पक्षपात करणाऱ्या अधिकाऱ्यांना इशारा देत त्यांनी आपली वर्तणूक सुधारावी अन्यथा त्यांना घेराव घालू, असा इशारा दिला. आमदार गणेश नाईक यांनी शुक्रवारी (दि. १४) नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याबरोबर नवी मुंबईतील विविध प्रश्नांवर बैठक घेतली. त्या वेळी नाईक बोलत होते.

लोकप्रतिनिधी नागरी सोयीसुविधांची कामे जनतेसाठी पालिका प्रशासनाला सुचवत असतात, परंतु महापालिकेचे काही अधिकारी जनतेच्या कामात पक्षपात करीत असतात. दुसरीकडे काही दबंग लोकप्रतिनिधींची अनावश्यक वारेमाप खर्चाची कामे मात्र वायूच्या वेगाने केली जातात. यासंदर्भात आक्रमक भूमिका घेत आमदार नाईक यांनी अशा पक्षपात करणाऱ्या अधिकाऱ्यांवर चौकशी करून कारवाईची मागणी केली. अन्यथा या अधिकाऱ्यांना लोकशाही मार्गाने आंदोलन करून घेराव घालण्याचा इशारा दिला. महापालिकेने विकास आराखड्यामध्ये आरक्षित केलेले आणि एमआयडीसीने महापालिकेकडे हस्तांतरित केलेले सुविधा भूखंड सिडको आणि एमआयडीसी दोन्ही प्राधिकरणांकडून विकण्यात येत आहेत. याप्रकरणी आमदार नाईक यांनी विधानसभेत आवाज उठवला होता. महापालिकेचे सुविधा भूखंड विकले जाऊ नयेत याची खबरदारी घेण्याची जबाबदारी पालिका प्रशासनावर असून पालिका अधिकाऱ्यांनी जागरूकपणे सुविधा भूखंड विक्री थांबवली पाहिजे, असे सांगून पालिकेच्या विकलेल्या भूखंडावरील बांधकामांना पालिकेने कम्प्लिशन सर्टिफिकेट देऊ नये, अशी मागणी त्यांनी केली.

**गढूळ पाणीपुरवठा, पाणीटंचाई दूर करा!**

**पालिकेच्या प्रशासकीय राजवटीमध्ये पाणीटंचाईची समस्या गंभीर झाली. नवी मुंबईचे स्वतःचे मालकीचे धरण असताना अशाप्रकारे पाण्याची वाणवा असता कामा नये, असे स्पष्ट करून लोकनेते आमदार नाईक यांनी सक्षम पाणीपुरवठा अधिकाऱ्यांकडून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची सूचना केली. त्याचबरोबर सध्या काही ठिकाणी होणारा गढूळ पाण्याचा पुरवठा बंद करण्यासाठी उपाय योजना करण्याची मागणीदेखील केली.**

महापालिकेच्या वतीने झोपडीधारकांना झोपडपट्टी ओळखपत्र देण्याचे काम सुरू आहे. शहरामध्ये ४३ हजार झोपड्या आहेत. त्यापैकी १९ हजार झोपडीधारकांना ओळखपत्र दिली जाणार आहेत. सुमारे २४००० झोपडीधारक ओळखपत्रापासून वंचित राहणार आहेत. त्यांच्यावर अन्याय नको असे नमूद करत लोकनेते आमदार नाईक यांनी दिघापासून बेलापूर पर्यंत सर्व झोपडपट्ट्यांचे पुन्हा एकदा सर्वेक्षण करून सर्वांना झोपडपट्टी ओळखपत्र देण्याची मागणी केली. या मागणीला आयुक्त नार्वेकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# भारतामध्ये गुंतवणूक करा -पंतप्रधान मोदी

**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारतामध्ये गुंतवणूक करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्समध्ये राहणाऱ्या भारतीय समुदायाला केले. ते पॅरीसमध्ये बोलत होते. या वेळी त्यांनी दहशतवाद आणि कट्टरवादासह अनेक विषयावर भाष्य केले. परदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या सुरक्षिततेसाठी भारत सरकार कमिटेड असल्याचा विश्वासही या वेळी पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला. फ्रान्समध्ये पोस्ट मास्टर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांना भारताकडून पाच वर्षांसाठी पोस्ट स्टडी व्हिसा देण्यात येईल, असेही मोदींनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन दिवसांच्या फ्रान्सच्या दौऱ्यावर असून त्यांचे पॅरिसमध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले. पंतप्रधान मोदी यांना या वेळी गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. प्रतिष्ठित ला सीन म्युझिकलमध्ये भारतीय समुदायाच्या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. आजचे दृश्य स्वतःच अप्रतिम आहे, हा उत्साह अभूतपूर्व आहे, हे स्वागत आनंदाने भरून जाणार आहे, असे ते म्हणाले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आपण भारतीय जिथे जातो तिथे



नक्कीच मिनी इंडिया बनवतो. काही लोक १२ तासांचा प्रवास करून येथे पोहचले आहेत. यापेक्षा मोठे प्रेम काय असू शकते. इतका प्रवास करून येथे आल्याबद्दल मी तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. या वेळी फ्रान्समध्ये माझे येणे अधिक विशेष आणि खास आहे, कारण फ्रान्सचा राष्ट्रीय दिवस आहे.

या वेळी पंतप्रधान मोदी यांनी फ्रान्समध्ये असणाऱ्या भारतीयांना भारतात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, माझा तुम्हाला आग्रह आहे की, आता आपल्याला भारतात गुंतवणुकीसाठीही संपूर्ण उत्साहाने समोर यावे लागेल. पुढील २५ वर्षांत भारत विकसित होण्याच्या दृष्टीने काम करत आहे. यामध्ये तुमची भूमिकाही मोठी आहे. आपण ज्या कोणत्या क्षेत्रात काम करीत असाल.

**जागतिक कल्याणासाठी भारत प्रयत्नशील**

*आज जग एका नव्या जागतिक व्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. भारताची भूमिका झपाट्याने बदलत आहे. भारत लोकशाहीची जननी आहे. भारत मॉडेल ऑफ डायवर्सिटी (विविधतेचा आदर्श) आहे. दहशतवाद आणि कट्टरतावादाविरोधात भारताचे प्रयत्न यशस्वी ठरले आहेत. जगाला प्रत्येक आव्हानाला तोंड देण्यासाठी भारताचे मदतीचे प्रयत्न आहेत. भारताचा हजारो वर्षांचा इतिहास आहे. जागतिक कल्याणासाठी भारताच्या प्रयत्नांची व्याप्ती खूप मोठी आहे, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.*

त्याच्याशी संबंधित संभावनांवर भारतात काम करा. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करा. भारतामध्ये गुंतवणूक करण्याची मोठी संधी आहे. जो लवकर भारतात गुंतवणूक करेल, त्याला जास्त फायदा होईल. हे मी आताच सांगतोय. पुन्हा म्हणाल सांगितले नाही. लाल किल्ल्यावरील भाषणातही मी हेच आव्हान केले होते. पुन्हा एकदा भारतात गुंतवणूक करण्याचे आव्हान करीत आहे.

# हवामान बदलामुळे पनवेल परिसरात साथीचे आजार

**पनवेल : वार्ताहर**

सध्या पावसाची रिपरिप तर कधी ऊन सुरू असल्याने वातावरणात वारंवार बदल होत आहेत. त्यामुळे पनवेल परिसरात साथीचे आजार बळावत आहेत. नागरिकांना ताप, सर्दी, खोकला यासारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्याचसोबत डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो या आजारांनीदेखील डोके वर काढले आहे.

कोविड काळात लागलेली टाळेबंदी आणि नागरिकांनी स्वच्छता विषयी घेतलेली काळजी तसेच रोगप्रतिकारकशक्ती वाढविण्यासाठी देण्यात आलेली भर यामुळे पनवेल परिसरात कोरोना व्यतिरिक्त साथीचे आजार रुग्ण कमी झाले होते, परंतु मागील वर्षीपासून पुन्हा साथीच्या आजारांनी डोके वर काढले आहे. यावर्षी हवामानात होणाऱ्या बदलामुळे पनवेल परिसरात सध्या साथीच्या आजारांनी डोके वर काढले आहे.

सध्या आजारांवर खासगी दवाखान्यात उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा साथीच्या रुग्णांची संख्या वाढ होत चालली आहे. डेंग्यू खालोखाल गॅस्ट्रोच्या रुग्णांत देखील वाढ होताना दिसत आहे. दरम्यान, नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# फुडलॅण्ड पुलाच्या दोन्ही मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या सहा महिन्यांपासून फुडलॅण्ड येथील रेल्वे पुलाच्या डागडुजीचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गावरील दोन्ही मार्गिका सुरू करण्यात आल्याने टिआयएचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांनी सिडकोचे आभार मानले आहेत.

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये जाण्यासाठी नावडे रेल्वे पुलावर पडत असलेला ताण लक्षात घेता कळंबोली स्टील मार्केट फूडलॅण्ड येथून एमआयडीसीमध्ये जाण्यासाठी सिडकोने नवीन पूल बांधला. परंतु, सद्यस्थितीमध्ये या मार्गावरून मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची वाहतूक होत असल्यामुळे या पुलाला खड्डे पडले होते. त्यामुळे तळोजा एमआयडीसी परिसरात जाणाऱ्या रेल्वे ओव्हर ब्रिजवर (आरओबी) रस्ते काँक्रिटीकरणाचे काम जलदगतीने करण्यासाठी तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशन (टीआयए) अध्यक्ष सतीश शेट्टी यांनी सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला होता.

अखेर सिडकोने सहा महिन्याच्या ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये दोन्ही मार्गिकिचे काम पूर्ण केल्याने तळोजा इंडस्ट्रीयल असोसिएशनचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांनी सिडकोचे आभार मानले आहेत.



# पनवेलमध्ये उद्या मल्हार महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात दिवस अथवा रात्रीच्या वेगवेगळ्या प्रहरानुसार राग गायले जातात, तर काही राग केवळ विशिष्ट ऋतूतच गायले जातात. मल्हार हा खास वर्षाकालीन राग म्हणून ओळखला जातो. म्हणून पनवेल कल्चरल असोसिएशनने येत्या रविवारी (दि. १६) सायंकाळी ५.३० वा. मल्हार महोत्सवाचे आयोजन केले आहे.

यात महेश राव, अजय ठोसर, संध्या खांबेटे, प्रकाश चिटणीस आणि मिलिंद गोखले हे कलाकार मल्हारांच्या विविध प्रकारांवर आधारित बंदिश, ठुमरी, दादरा, नाट्यगीते आणि भावगीते आणि हार्मोनियम सोलो सादर करतील. त्यांना साथसंगत करतील, हार्मोनियमवर प्रकाश चिटणीस आणि ओजस जोशी तर तबलासाथ प्रदीप दीक्षित आणि विनायक प्रधान करतील. हा कार्यक्रम सर्व रसिकांसाठी खुला आहे.

# राज्य कुपोषणमुक्त करण्यावर भर देणार -ना. आदिती तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी राज्यातील कुपोषणमुक्तीसाठी तसेच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी युद्धस्तरावर काम करणार असल्याची ग्वाही दिली आहे. त्याचप्रमाणे देशभराच सध्या चर्चिला जात अससेला बेपत्ता मुली तसंच वाढते महिला अत्याचार या संदर्भात महाराष्ट्र पोलीस, महिला आयोग तसेच बालहक्क आयोग, विधी व न्याय विभागाची मदत घेऊन प्राधान्याने काम केले जाईल, अशी भूमिका आदिती तटकरे यांनी व्यक्त केली. मंत्रिमंडळ खातेवाटप जाहीर झाल्यानंतर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी तातडीने कामास सुरुवात केली. महाराष्ट्रातील बालमृत्यू, बालविवाह, कुपोषण या समस्यांच्या निर्मूलनाबरोबरच महिलांमध्ये आंत्रप्रन्योरशीप विकसित करण्याचं ही काम महिला व बालविकास विभाग करते. महिला व बालविकास, खउउद्ध, बालहक्क समिती, महिला आयोग, राजमाता जिजाऊ मिशन, महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या माध्यमातून महिला व बालविकास खाते महिला व बालकांच्या सर्वांगिण विकासाचे काम करत आहे. प्रत्येक महिलेला योग्य शिक्षण, काम, पोषणासंदर्भातली माहिती, बालकांच्या विकासात पुरुषांचा सहभाग, अशा विविध मार्गांतून हा विभाग यापुढे काम करेल असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

अंगणवाडी सेविका या महिला व बालविकास विभागाच्या अँबेसेडॉर आहेत. या अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, बचत गट तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या समन्वयातून राज्याला एक आदर्श वाटेल अशी व्यवस्था आपण निर्माण करू. पोषण अभियानात संपूर्ण देशात राज्याने सातत्याने चमकदार कामगिरी केली आहे. यंदा ही महाराष्ट्राची कामगिरी अशीच कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ही महिला व बालविकास मंत्री आदिती यांनी सांगितले आहे.

महिला व बालविकास विभाग या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील विभागाची जबाबदारी पार पाडण्यासाठी निवड केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे तसंच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सर्वांचे आदिती तटकरे यांनी आभार मानले आहेत.

**पान १ वरून**

## प्रगतीमध्ये सातत्य ठेवा

सीकेटी उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, माध्यमिक विभाग मराठी माध्यम मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यम मुख्याध्यापक संतोष चव्हाण, प्राथमिक विभाग मराठी माध्यम मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यम मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अजित सोनवणे, स्वाती पाटील यांच्यासह पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना शिंदे-पवार यांनी मनोगतात प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशप्राप्ती कशी करता येते हे जीवनपट उलगडून विद्यार्थ्यांना सांगितले. या वेळी त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल गौरवोद्गार काढले, तर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना भरपूर अभ्यास व कष्ट करून आयुष्य घडवा, असा बहुमोल सल्ला दिला.

इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत विशेष यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा या वेळी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गुणगौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांनी केले. माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यम मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी आभार मानले. ताम्हणकर यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महादेववाडी शाळेत शैक्षणिक साहित्यवाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दक्षिण रायगड भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून बुधवारी (दि. १२) राजिप महादेववाडीत शाळेत शैक्षणिक साहित्य व खाऊवाटप करण्यात आले.

या वेळी भाजप रोहा तालुका कामगार आघाडी अध्यक्ष विलास डाके, जिल्हा सरचिटणीस ओबीसी मोर्चा राजेश डाके, युवा मोर्चाचे सरचिटणीस नरेश कोकरे, भाजप धाटाव अध्यक्ष कृष्णा बामणे, रायगड सोशल मीडिया प्रमुख अमर वारंगे, विद्यार्थी आघाडी प्रमुख वैभव कुलकर्णी, तालुका युवा मोर्चाचे सरचिटणीस चंद्रकांत पवार, उपाध्यक्ष अनिल खंडागळे, धर्मा कोकरे, हाजी कोटारी, राकेश चाफेकर, संकेत मोरे, धिरज मोंडे, सन्मेष सुटे, मुख्यध्यापक रामचंद्र भोईर, ललित लेंडी उपस्थित होते.




**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**

**पिनकोड-४१० २०६**

E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०**

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ५५ (ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण १० काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १४.०७.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक २८.०७.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक : १५/०७/२०२३

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

# पनवेल मनपाकडून आरोग्यसेवांचे बळकटीकरण

## आपला दवाखाना व पाच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तज्ज्ञांकडून उपचार

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात आपला दवाखाना तसेच पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये लवकरच तज्ज्ञ डॉक्टर उपचारासाठी उपलब्ध होणार आहेत. यामध्ये भिषक (एमडी फिजीशियन), बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, यांच्या सेवा आठवड्यातून एक दिवस तर त्वचारोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, कान -घसा- नाक तज्ज्ञ, मनोविकार तज्ज्ञ यांच्या १५ दिवसांतून एकदा सेवा देण्यात येणार आहे.

अनेक नागरिक संध्याकाळी दवाखान्यात येत असतात, हे लक्षात घेऊन महापालिकेने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सकाळच्या ओपीडीबरोबरच दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत ओपीडी सुरू केला आहे. लवकरच



खारघर येथील आपला दवाखना व महापालिका क्षेत्रातील गावदेवी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र एक, आणि कळंबोली, खारघर, कामोठे, पालेखुर्द येथील आरोग्य वर्धिनी केंद्र याठिकाणी संध्याकाळी ५ ते ९ या वेळेत सात प्रकारच्या आरोग्य सेवा देण्यात येणार आहेत.

यामध्ये भिषक (एमडी फिजीशियन), बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, यांच्या सेवा आठवड्यातून एकदा तर त्वचारोग, नेत्ररोग, कान-घसा-नाक तज्ज्ञ, मनोविकार तज्ज्ञ यांच्या पंधरा दिवसातून एकदा सेवा दिल्या जाणार आहेत.

या सेवा सुरू झाल्यानंतर याची माहिती प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तसेच महापालिकेच्या अधिकृत वेबसाईटवरती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील सेवा या सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू केल्या आहेत. याचबरोबरीने लवकरच पाच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये विविध सात प्रकारचे तज्ज्ञ डॉक्टर नागरिकांच्या सेवेत रूजू होणार आहेत. नागरिकांनी या सेवेचा आवश्य लाभ घ्यावा.**

**-गणेश देशमुख**, आयुक्त, पनवेल मनपा

**सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने आजारी पडण्याचे प्रमाण जास्त असते. नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सकाळी १० ते २ व दुपारी २ ते १० या वेळेत जाऊन आरोग्यसेवांचा लाभ घ्यावा. महापालिका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुमारे ४० प्रकारच्या रक्तचाचण्या केल्या जात असून याचा नागरिकांनी याचा लाभ घ्यावा. महापालिका आरोग्य सेवांमध्ये वाढ करत असून तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा लवकरच सुरूवात करणार आहे.**

**-डॉ. आनंद गोसावी**, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी

## इंद्रायणी डोंगर परिसरात १००० बियांचे रोपण

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील निवृत्त क्लासवन अधिकारी श्रीधर मुकुंद मोकल यांनी आपल्या आदिवासी सहकारी मित्रांना बरोबर घेऊन, आंबा, जांभूळ, मोह या जातीच्या झाडांच्या एक हजाराहून अधिक बियांचे रोपण केले. याआधी त्यांनी बियाणे टाकून तयार केलेली अनेक झाडे इंद्रायणी डोंगर परिसरात पहायला मिळत आहेत.



श्रीधर मोकल यांचे वडील निवृत्त मुख्याध्यापक तथा प्रगतशील शेतकरी स्व. मुकुंद मोकल यांनी एकेकाळी येथील शेतकऱ्यांना शेतीला पूरक उत्पादन देणारा व्यवसाय म्हणून, आंबा फळपीक लागवडीकडे वळविले. आज चिरनेर परिसरात बऱ्याच शेतकऱ्यांच्या हापूस आंब्याच्या बागा उभ्या आहेत. यातून येथील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आंबा पिकाचे उत्पादन मिळत आहे.

## बीसीटी विधी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी चांद्रयान मोहिमेचे प्रक्षेपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी चांद्रयान-३चे प्रक्षेपण महाविद्यालयामध्ये पाहिले.

गुणवत्ता हमी कक्षामार्फत सहाय्यक प्रा. हिमांशू मोरे यांनी प्रभारी प्राचार्य धनश्री कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थी व प्राध्यापकांना अंतराळ संशोधनाच्या जगात प्रबोधन करणे हा होता. या उपक्रमात प्रा. भाग्यश्री एन. कांबळे, सहाय्यक प्रा. अपराजिता ए. गुप्ता, सहाय्यक प्रा. रवनिश बेक्टर, पल्लवी खोत, हृषिकेश हुद्दार, उज्वल पाटील, विश्वास ठाकूर यांचे सहकार्य लाभले.



## करंजाडेतील अतिक्रमणावर सिडकोची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर अतिक्रमणात वाढ झाली होती. यासंदर्भात विविध सामाजिक संस्था व राजकीय पक्षाने सिडकोच्या अतिक्रमण विभागाकडे तक्रारी केल्या होत्या. त्यानुसार सिडको अतिक्रमण विभागाचे अधिकारी भवारे यांच्या मार्गदर्शनाखाली तोडक कारवाई करण्यात आली.

करंजाडे परिसरातील कॉलेज फाटा रोड, सेक्टर २, ३ आणि ४ या भागातील बेकायदेशीर अतिक्रमणे त्यामध्ये प्रामुख्याने झोपड्या, टपऱ्या, फळ व भाजीविक्रेते, कोंबडी व मटण विक्रेते आदींसह बेकायदेशीररित्या व्यवसाय करणाऱ्यांवर तोडक कारवाई करण्यात आली. यासाठी सिडको अतिक्रमण विभागातर्फे एक जेसीबी, दोन डंपर, ३० पोलीस अधिकारी व कर्मचारी, २५ सिडकोचे अधिकारी व कर्मचारी आदींच्या सहाय्याने ही कारवाई पार पडली.

या कारवाईचे करंजाडेमधील नागरिकांनी स्वागत केले असून अशाचप्रकारे सातत्याने कारवाई करावी, अशी मागणी सिडकोकडे केली आहे.



## पनवेलमधील आंबे, शिरवली विभागात वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समिती व जागृती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिरवली विभाग, आंबे राजिप शाळा येथे वृक्षारोपण करण्यात आले.

या वेळी पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचे तथा जागृती फाउंडेशन अध्यक्ष निलेश सोनावणे, शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता ढेबे, संपादक गणपत वारगडा, तळोजा विभागीय अध्यक्ष कल्पेश कांबळे, उपाध्यक्ष संदेश पाटील, शिरवली विभाग अध्यक्ष प्रितेश भोईर, संपादक शंकर वायदंडे, प्रतिनिधी राम बोरीले, उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते रवी पाटील, जागृती फाउंडेशनचे उत्तर विभागीय सेलचे अध्यक्ष नीरज सिंग, रोहिन उलवेकर, ग्रामपंचायत सदस्य रेश्मा पाटील, पोलीस पाटील भांगे, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष सुषमा गहिनाथ रानी, उपशिक्षिका सुरेखा भाविक, अंगणवाडी शिक्षिका प्रमिला भोरे, दशरथ पाटील, योगेश पाटील, सुनील पाटील, कल्पेश नाईक, जगदिश भोईट, रोशन पाटील, अजय आंबे, दिलीप भोईर, अक्षय कने, रुतिक पाटील, अभिजीत पाटील, आशीर्वाद खानावकर, गणेश रवी, अशोक उलवेकर, अक्षय म्हात्रे, प्रमोद भोईट, आकाश भोईट, रवीकांत भोईर, भावेश रघवी आदी उपस्थित होते.

पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी सगळ्यांनीच काम केले पाहिजे या संकल्पनेतून वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा; शेतीकामांना वेग

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून शेतीच्या कामांनी वेग घेतला आहे.

या वर्षी चांगल्या पद्धतीने पाऊस होत असल्यामुळे एक आठवड्यात भात लागवडीस प्रारंभ होणार असल्याचे शेतकरी बांधवांनी सांगितले. दिवसभरात पावसाचे आगमन होत आहे.

शेतातील राब उत्तमप्रकारे तयार होवून लागवडीसाठी होइल, मात्र अजून सातत्याने त्या पावसाच्या सरी निर्माण होवून त्या बळीराजास तृप्त करावे, अशी प्रार्थना त्या वरून राजाकडे करीत आहे. शेतामध्ये पेरलेल्या धान्याला चांगले राब तयार होत असून, काही ठिकाणी तर एक आठवड्यात भात लागवडीस तयार होणार आहे. यासाठी वरून राजाचा अभिषेक त्या बळीराजावर व्हावे यासाठी तो सातत्याने त्यांच्यकडे विनवणी करीत आहे.


सुरुवातीला आपल्या आगमनाची चाहूल देणाऱ्या पावसाने रायगडकरांना हुलकावणी दिली होती. अधून मधून पडणाऱ्या किरकोळ सरींमुळे भातरोपांनी तग धरून ठेवला होता. तर काही भात रोपांची उगवणही झाली नव्हती. काही दिवसांपूर्वी पावसाने जिल्ह्यात हजेरी लावून, बरसायला सुरुवात केली. त्यामुळे शेतात चांगले पाणी झाले असून कामांना वेग आला आहे.



## कळंबोलीत भाजपचे महाजनसंपर्क अभियान



**कळंबोली :** देशाचे लोकप्रिय व यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपच्या वतीने महाजनसंपर्क अभियान राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी कळंबोलीत दौरा करून विविध क्षेत्रातील व समाजातील नागरिकांच्या भेटी घेतल्या आणि मोदी सरकारच्या योजना, कार्य याची माहिती दिली. यामध्ये नरेश गुप्ता, श्री. गितेश, उर्मिला पाटील, नितीन जाधव, राजविर कासवान, राजेंद्र शर्मा, विक्रम जाधव, सचिन केकाण, किसन कदम, संजय कड्डू, संजय धनासुरे, दुधराज चौधरी, विराज पटेल, सुभाष घाडगे, पंडित धायगुडे यांच्या घरी जाऊन सुसंवाद साधण्यात आला. त्यांच्यासोबत माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते होते.



**पनवेल : कामोठे सेक्टर २० येथे नव्याने एसएम टॅटू प्लानेट ॲण्ड पीअरसींग सेंटर स्मिता जोशी यांनी सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्यांनी स्मिता जोशी यांचे अभिनंदन करीत त्यांना व्यवसायाच्या पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, महिला मोर्चाच्या अंजली इनामदार, निखिल गोरे आदी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)





**पनवेल : खांदा कॉलनी येथील किया शोरूममध्ये सेलटॉस या कारचा लॉन्चिंग सोहळा शुक्रवारी आयोजित करण्यात आला. महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते ही कार लॉन्च करण्यात आली. या वेळी भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, राहुल घरत, एमडी राजेश शहा, अपर्णा राजेश शहा, हर्षित शहा, पिंकी वैष्णव, अमेय घोरपडे आदी उपस्थित होते.** (छाया : विकास पाटील)

## संपादकीय

# अग्निपरीक्षेत उत्तीर्ण

तिन्ही सत्ताधारी पक्षांमध्ये खातेवाटप कसे साधायचे हा खरोखरच कळीचा मुद्दा होता, परंतु अशा तारेवरच्या कसरतीमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माहीर आहेत. या अग्निपरीक्षेतदेखील ते पैकीच्या पैकी गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत असेच म्हणावे लागेल.

**जनतेच्या माथ्यावर मारण्यात आलेले महाविकास आघाडीचे सरकार पायउतार झाले त्याला वर्ष उलटून गेले. या वर्षभराच्या काळात महाराष्ट्राचा कारभार चांगल्याच गतीने चालवला गेला हे कोणीही अमान्य करणार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांनी मंत्रिमंडळातील मोजक्या सहकाऱ्यांच्या साथीने गतिमान निर्णय घेतले. मंत्रिमंडळाचा विस्तार केव्हा होणार असा सवाल केला जात होता. शिंदे यांची पाठराखण करणाऱ्या शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विरोधात गेल्यास सगळेच मुसळ केरात जाईल असे बोलले जात होते. मंत्रिमंडळाचा विस्तार कधीच होणार नाही, अशी टीका विरोधकांकडून होत होती. खुद्द शिंदे यांच्या पाठिराख्यांमध्येही चिंतेचे वातावरण पसरले होते. मंत्रिमंडळाचा विस्तार आज होणार, उद्या होणार, अधिवेशनानंतर होणार अशा वावड्या उठत राहिल्या आणि गेल्या महिन्यात अचानक निराळाच राजकीय बॉम्ब फुटला. ध्यानीमनी नसताना माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजकीय मंचावर जोरदार एंट्री घेतली. आपल्या काकांची साथ सोडून, बहुतेक सगळेच आमदार सोबत घेऊन अजित पवार सत्ताधारी गोटात डेरेदाखल झाले. त्यानंतर मंत्रिमंडळाच्या विस्ताराच्या बातम्यांचे पेव फुटले होते. तसे होणे स्वाभाविकच आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात अर्थमंत्री राहिलेल्या अजित पवार यांनी निधीवाटपाबाबत सापत्नभाव दाखवला होता असा आरोप शिंदेसमर्थक आमदार उघडपणे करीत होते. या वेळी अर्थखात्याची जबाबदारी त्यांच्याकडे जायला नको म्हणून प्रयत्न झाले. तथापि पुन्हा एकदा राजकीय उमदेपणा दाखवत फडणवीस यांनी आपल्याकडील अर्थ व नियोजन खाते अजित पवार यांना बहाल केले आहे. फडणवीस यांच्याकडे गृहखाते, विधि व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा आणि राजशिष्टाचार ही खाती राहतील. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण ही खाती देण्यात आली आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या सहकार मंत्रालयाचे प्रमुख आहेत. महाराष्ट्रात महत्त्वाचे मानले जाणारे सहकार खाते दिलीप वळसे-पाटील यांच्याकडे गेले आहे. धनंजय मुंडे हे महाराष्ट्राचे आता नवे कृषी मंत्री असतील, तर दादा भुसे यांच्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाची जबाबदारी टाकण्यात आली आहे. उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत पाटील यांच्याकडे असेल, तर शालेय शिक्षण दीपक केसरकर यांच्याकडेच राहील. फारशी कुणाची खाती न बदलता अतिशय कल्पकतेने खातेवाटपाचा विषय हाताळण्यात आला आहे हे यादीवर नजर टाकल्यास लगेच कळते. मुख्यमंत्री शिंदे यांच्या समर्थक आमदारांवर अन्याय होणार नाही आणि नव्याने सरकारमध्ये दाखल झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील ज्येष्ठांना वजनदार खाती मिळतील हे आवर्जून बघण्यात आले असे दिसते. यालाच राजकीय चतुराई किंवा कूटनीती असे म्हणतात. सर्वांचे समाधान करणाऱ्या खातेवाटपानंतर शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी यांच्या महायुतीचे हे सरकार वेगाने काम करेल अशी अपेक्षा आहे. राजकीय मतभेद बाजूला ठेवून राज्याच्या विकासासाठी कटिबद्ध असलेले आणि तळागाळातील जनतेशी नाळ जुळलेले मंत्री आता महाराष्ट्राला लाभलेले आहेत.**

# ताम्र धातूवरील आकर्षक मिनाकारी व शिल्पकला



**खबरबात**
**धम्मशील सावंत**

ताम्र धातूवरील आकर्षक मिनाकारी व शिल्पकला भारतात शेकडो वर्षांपासून आहे. आधुनिकतेच्या काळात ही कला लोप होण्याच्या मार्गावर असताना अलिबाग तालुक्यातील भायमळा या गावात संजय पाटील व त्यांचा मुलगा विक्रांत पाटील हे पिता-पुत्र ही प्राचीन कला जोपासण्याचे काम करीत आहेत. विशेष म्हणजे देशी-परदेशी नागरिक येथे येऊन ही कला जाणून घेत आहेत.

या कलेला इंग्रजीमध्ये कॉपर एनॅमल आर्ट्स अ‍ॅण्ड क्राफ्टस् असे म्हणतात. अलिबाग कार्लेखिंडीत वसलेले भायमळा गाव अनेकांना अपरिचित आहे. काही वर्षांपूर्वी येथे हे काम करणारे तीन-चार कलाकार होते. विक्रांत व संजय पाटील हे अजूनही या व्यवसायात टिकून आहेत. याबरोबरच कॉपर एनॅमल आर्ट्स अ‍ॅण्ड क्राफ्टस् हे पेज इन्स्टाग्रामवर तयार करून याबाबत माहिती पोहचवत आहेत.

ताम्रपटावर चित्र रेखाटून त्यावर नेत्रदीपक मिनाकारी (वैशिष्ट्यपूर्ण रंग भरणे) कलाकृती निर्माण करणे, तांब्याच्या पत्र्यावर विविध आकार व चित्र आकर्षक रंगाने रंगवून कलाकृती तयार करण्याची कार्यशाळा संजय व विक्रांत आपल्या घराजवळ चालवित आहेत. हे अतिशय मेहनत, परिश्रम, जिद्द, चिकाटी, अनेक तास-दिवस खर्ची टाकून करावयाचे काम ते अतिशय आत्मियतेने करतात.

विक्रांतचे वडील संजय पाटील गेली ४७ वर्षे ही कला टिकावी याकरिता हा व्यवसाय करीत आहेत. अनेक चढ-उतार त्यांनी पाहिले. सध्या तांब्याची वाढलेली किंमत ही एक मोठी समस्या जाणवत आहे. मुंबईमधील काही संस्था व व्यावसायिक या कामात साथ देत आहेत. विशेष म्हणजे तरुण मुलेमुली या कलेत रस घेत आहेत. काही तरुण भायमळा येथे ८-१५ दिवस राहून आपली कलाकृती पूर्ण करतात.







### अप्रतिम कलाकृती

या कार्यशाळेत दोन सेंमी ते १२ फूटपर्यंत विविध आकाराचे चित्र/शिल्प तयार होते. काही घरातील वॉल पीस, दरवाजा, झुंबर, वॉल लँप, टेबल लँप अशा विविध कलाकृती तयार केल्या जात आहेत. एका ताम्र चित्र किंवा ताम्र शिल्पसाठी काही तास ते काही दिवस किंवा महिनेसुद्धा वेळ द्यावा लागतो, तेव्हा मनासारखे शिल्प तयार होते.

### सर्वोत्तम कलाकृती

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनावरण झालेला ८X१२ फूट भारताचा नकाशा यामध्ये स्थळ वैशिष्ट्यांसह सर्व राज्य दर्शविणारे शिल्प हे आपल्या आजवरच्या निर्मितीमधील उच्चतम शिल्प असल्याचे विक्रांतचे वडील संजय पाटील यांनी सांगितले.

### कला टिकविण्यासाठी धडपड

मुघल काळापासून राजवैभव असलेली ही ताम्रपटावरील चित्रकला व शिल्पकला टिकावी याकरिता तरुण कलाकार विक्रांत संजय पाटील मनापासून काम करीत आहे. या आगळ्यावेगळ्या छंदाला आणि कलेवरील प्रेमाला अनेक दाद देतात.

## बदलते तंत्रज्ञान

# युट्यूबवर 'या' व्हिडीओतून दर महिन्याला भरपूर कमाई




युट्यूबवर कुठलाही व्हिडीओ अपलोड करण्यापूर्वी आपल्याला काही महत्त्वाच्या गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे लागते. याच्या सहाय्याने आपण दर महिन्याला ५० हजार रुपयांची कमाई करू शकता. तर जाणून घेऊयात, यूट्यूबच्या माध्यमाने पैसे कसे कमावले जाऊ शकतात? आणि यासाठी कुठल्या गोष्टी आवश्यक असतात? या या संदर्भात...

चॅनल तयार करा-सर्वप्रथम यूट्यूबवर आपले चॅनल तयार करा. हे चॅनल आपल्याला आपले व्हिडीओ एकत्र ठेवायला मदत करेल तसेच यूजर्सना आपले चॅनल सब्सक्राइब करण्याची सुविधा देईल.

सातत्याने अपडेट करा-यूट्यूबवर नियमितपणे व्हिडिओ अपलोड करा. नवे आणि मनोरंजक व्हिडीओ बनवण्याचा प्रयत्न करा. यामुळे यूजर्स आपल्या चॅनलवर पुन्हा-पुन्हा येण्यास मदत होईल. तसेच आपले सब्सक्रायबर्स वाढतील.

व्हिडीओ नियमितपणे प्रमोट करा-आपले व्हिडीओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर शेअर करा तसेच आपल्या मित्रांना, कुटुंबातील सदस्यांना समर्थकांना पाठवा.

व्हिडीओ मॉनिटाइज करा-जेव्हा आपल्या चॅनलवर पुरेसे सब्सक्रायबर्स आणि व्हिडीओ असतील, तेव्हा तुम्ही तुमचे व्हिडीओ मॉनिटाइज करू शकता. यूट्यूबच्या पार्टनर प्रोग्रॅमच्या माध्यमाने जाहिराती आपल्या व्हिडीओमध्ये प्रदर्शित करा आणि त्यापासून उत्पन्न मिळवा.

स्पॉन्सरशिप आणि प्रचार करा-आपण आपले चॅनल विविध कंपन्यांच्या स्पॉन्सरशिप आणि प्रचारासाठी वापरू शकता. ते आपल्या व्हिडीओमध्ये त्यांच्या उत्पादनाच्या प्रचारासाठी पैसे देऊ शकतात.

यूट्यूबद्वारे पैसे कमावण्यासाठी आपल्याकडे तत्परता, मेहनत, आणि नाविण्य असणे आवश्यक आहे. जर आपल्यात उच्च गुणवत्तेचे व्हिडीओ तयार करण्याची क्षमता असेल आणि आपण आपले चॅनल व्यवस्थित पद्धतीने मॅनेज करू शकत असाल, तर यूट्यूबद्वारे पैसे कमावणे सोपे आहे.

# साहित्यिक माधव कोंडविलकर



**निमित्त**

समाजातील तळागाळातील घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांच्या व्यथा कायम लेखनात मांडून समाजव्यवस्थेविरुद्ध कायम आसूड ओढणारे तळमळीचे कार्यकर्ते व प्रसिद्ध लेखक माधव गुणाजी कोंडविलकर (वय ८०) यांचा आज जन्मदिन आहे. त्यानिमित्त त्यांचा हा अल्प परिचय...

माधव कोंडविलकर यांचा जन्म १५ जुलै १९४१ रोजी कोकणातील एका आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेल्या खेड्यामध्ये झालेला आहे. आधुनिक व पुरोगामी विचारसरणीचा स्पर्श या खेड्याला झालेला नव्हता. अशा अंधःकारमय पार्श्वभूमी लाभलेल्या खेड्यात माधव कोंडविलकरांचे बालपण गेले. गावात अस्पृश्यता पाळली जात असल्यामुळे आणि अस्पृश्य समाजात जन्माला आलेले असल्यामुळे लाचारीचे जीवन कोंडविलकर कुटुंबीयांच्या वाट्याला आलेले होते. शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेल्या खेड्यामध्ये माधव कोंडविलकरांची घुसमट होत होती. चातुर्वर्ण्य व्यवस्थेखाली दबल्या गेलेल्या बेबंद व दहशतीच्या वातावरणातून माधव कोंडविलकरांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत गेली. प्राथमिक शिक्षण म्हणून सेवाही कोकणातील अशाच खेड्यामधून झालेली होती. या जीवनानुभवामुळेच माधव कोंडविलकरांच्या साहित्यलेखनाला स्वानुभवाची धार असल्यामुळे त्यांच्या साहित्यनिर्मितीत दलित व दरिद्री जीबनाची दाहकता व्यक्त होते. कोकणातील लोकांचे विविध प्रश्नव आणि समस्या कोंडविलकरांच्या वाङ्मयातून जिवंत झाल्याशिवाय राहत नाही. कोंडविलकरांच्या मांडणीतील जिवंतपणामध्ये त्यांच्या जीवनसंदर्भाचा वाटा अतिशय मोलाचा आहे.

माधव कोंडविलकर यांचे मूळ गाव 'कोंडिवली' हे असून, ते रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्याडत वसलेले आहे. माधव कोंडविलकरांचे पूर्वज त्या गावातील प्रमुख बलुतेदार होते. निजामशाहीपूर्वीच्या काळात बलुतेदारीच्या निमित्ताने कोंडिवलीहून रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील 'पडवे' या गावात कोंडविलकरांच्या पूर्वजांचे पहिले स्थलांतर झाले. माधव कोंडविलकरांच्या अनेक पिढ्या पडवे या गावात नांदलेल्या होत्या. सोगमवाडी (ता. राजापूर) या गावातील कुणब्यांनी 'पडवे' गावातून माधव कोंडविलकरांचे पणजोबा रामजी यांना आपल्या गावात स्वतंत्र चर्मकार असावा म्हणून गावात येण्याचे आमंत्रण दिले. सोगमवाडीत घर बांधायला रामजींना जमीन दिली. रामजींनी आपल्या चार मुलांपैकी तीन मुले पडवे गावात ठेवून माधव कोंडविलकर यांचे आजोबा विश्राम या मुलाला सोगमवाडीत आणले. माधव कोंडविलकरांच्या पूर्वजांचे दुसरे स्थलांतर सोगमवाडी या गावात झाल्याचे दिसून येते.

सोगमवाडीत संपूर्ण अस्पृश्यता पाळली जात होती. माधव कोंडविलकरांच्या कुटुंबातील स्त्री-पुरुषांना, मुलांना सोगमवाडीत गावातील ब्राह्मण, वाणी, कुणबी, भंडारी, न्हावी, तेली, सोनार इत्यादी लोक स्पर्श करीत नसत. सोगमवाडीत चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे प्रकर्षाने पालन होत असे. सोगमवाडीत फक्त चौथीपर्यंत एकशिक्षकी शाळा होती. पोस्ट, प्राथमिक शाळा, तलाठी व ग्रामपंचायत कार्यालय, वाचनालय, रास्त दराचे धान्य दुकान, भार्गवराम (आर्यभट्ट परशुराम) यांचे देऊळ सोगमवाडीपासून सहा मैलांच्या अंतरावर होते. थोडक्यात फार काही नागरी सुविधा त्या गावात नव्हत्या.

माधव कोंडविलकरांचे आजोबा सोगमवाडीत आंबा, फणस, काजू इत्यादी फळझाडे असलेल्या ओढा व जैतापूरची खाडी असलेल्या रमणीय निसर्गात उभारलेल्या कोकणातील खेड्यातील झोपडीत राहत होते.

'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' ही त्यांची गाजलेली कादंबरी होय. याच कादंबरीवरून नाटक झाले होते, तसेच १९८५मध्ये कादंबरीचा फ्रेंच भाषेत अनुवाद झाला होता. १९९२ व २००१ साली कादंबरीचा हिंदी अनुवादही झाला होता.

**(साभार : बाईट्स ऑफ इंडिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : समाधानकारक पावसामुळे तालुक्यात भातशेतीच्या लावणीला प्रारंभ झाला आहे.** (छाया : जीवन केणी)

## आरोग्य प्रहर

# साखर पूर्णपणे सोडल्याने होऊ शकतात 'हे' दुष्परिणाम



भारतात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या इतकी जास्त आहे की या आजाराबद्दल भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे. मधुमेहाच्या रुग्णांना साखर आणि गोड पदार्थ कमी खाण्याचा सल्ला दिला जातो. ज्यांना हा आजार टाळायचा आहे ते साखरेपासून स्वतःला दूर ठेवू लागतात, पण साखर पूर्णपणे सोडणे योग्य नाही, त्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. असे पाऊल उचलल्याने काय दुष्परिणाम होऊ शकतात हे जाणून घेऊया.

साखरेचे दोन प्रकार आहेत, एक नैसर्गिक आणि दुसरा प्रक्रिया केलेली साखर. आंबा, अननस, लिची, नारळ या फळांपासून नैसर्गिक साखर मिळते, परंतु प्रक्रिया केलेली साखर ऊस आणि बीटरूटपासून तयार केली जाते. साखर नियंत्रणात ठेवणे हा योग्य निर्णय आहे, परंतु तो पूर्णपणे सोडणे योग्य मानले जात नाही.

ऊस आणि गोड बीटरूटपासून प्रक्रिया केलेल्या सुक्रोजमध्ये कॅलरी जास्त असतात, जरी त्याचे कोणतेही पौष्टिक मूल्य नसले तरी नैसर्गिक साखरेमध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजे मुबलक प्रमाणात आढळतात. गोड पदार्थांची चव आपल्या सर्वांना आकर्षित करते, त्यामुळे ती पूर्णपणे सोडून देणे हा सोपा निर्णय नाही, परंतु जर आपण ते दैनंदिन आहारातून काढून टाकले तर आपल्याला नुकसान देखील सहन करावे लागू शकते.

अनेक संशोधनातून असे समोर आले आहे की जे लोक अचानक साखर सोडतात त्यांच्या शरीरात तेवढाच परिणाम होतो जेवढा एखादं व्यसन सोडणाऱ्या व्यक्तीवर होतो. यामुळे तुम्हाला लवकर थकवा येईल, डोकेदुखीची, चिडचिडेपणा येईल.

साखर सोडण्याचा परिणाम आपल्या शरीरावर हळूहळू होईल. हा ऊर्जेचा स्त्रोत असल्याने त्यापासून स्वतःला दूर ठेवताना आळसाचं प्रमाण वाढेल. साखर सोडली की शरीरातून अतिरिक्त इन्सुलिन कमी होऊ लागते. जरी आपण प्रक्रिया केलेली साखर खाणे थांबवले तरी गोड फळांचे सेवन सुरू ठेवा, जे आपल्याला नैसर्गिक साखर देईल आणि शरीरात उर्जा ठेवेल.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

निवडक

## राजपुरी अंगणवाडीत सुदृढ बालक स्पर्धा



**मुरूड** : अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड अंतर्गत ग्रामपंचायत राजपुरी येथील कोळीवाडा अंगणवाडी आणि सुंदर नगर अंगणवाडीत सुदृढ बालक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमांतर्गत अंगणवाडीमधील शून्य ते सहा वर्षापर्यंत सर्व बालकांचे वजन उंची व दंडघेर मोजण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये राजपुरी कोळीवाड्यातील १७९ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. बालकांच्या विविध तीन गटांमध्ये निवड करण्यात आली व एकूण १८ सुदृढ बालकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला माजी सरपंच हिरकणी गिदी, दिघी पोर्टचे सुरक्षा विभागाचे प्रशांत पाटील, अदानी फाऊंडेशनचे अवधूत पाटील, अंगणवाडी सेविका दमयंती घागरी, मदतनीस व पालक उपस्थित होते.

## कळमशेत शाळेत साहित्यवाटप

**माणगाव** : शिक्षक जगदिश हिरू कासे यांनी शुक्रवारी (दि. १४)राजिप शाळा कळमशेत येथे विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य वाटप केले. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत व्हावी या हेतूने शालेय विद्यार्थ्यांना त्यांनी दप्तर, वह्या व इतर साहित्याची मदत भेट केली आहे. या वेळी मुख्याध्यापक राजू पठारे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा वैशाली नाक्ते, महिला मंडळ अध्यक्षा शांतीबाई मांडवकर, अंगणवाडी ताई योगिता गावडे महिला मंडळ सदस्या शकुंतला नाक्ते, गौरी नाक्ते, रिना नाक्ते, मंदा नाक्ते, मंगला शिर्के, सारिका नाक्ते, गौतमी शिर्के, नेहा नाक्ते, मिशा मनवे आदी उपस्थित होते.

## वावोशीतून अल्पवयीन मुलगा बेपत्ता

**खालापूर** : वावोशीतील दांड आदिवासीवाडी येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा १८ जून रोजी सकाळी ९ वा. सुमारास घरातून गेला तो अद्याप परतला नसल्याने त्याच्या आईने तो बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे. विष्णु दामु पवार असे या बेपत्ता झालेल्या मुलाचे नाव आहे. विष्णु पवारने आईकडे १०० रुपये मागून वावोशी फाटा येथे जाऊन येतो असे सांगून घरातून निघून गेला तो अद्यापपर्यंत घरी परतला नाही. खालापूर पोलीस दुरक्षेत्र पोलिसांनी तक्रार दाखल केली असून संबंधित मुलाबाबत माहिती असल्यास पोलिसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# घरफोडी करणारे सराईत चोरटे जेरबंद

## १० तोळे सोने व कार जप्त; राज्यात एकूण २९ गुन्हे दाखल

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील जगदंबा सिद्धी अपार्टमेंट चिंचपाडा व रामवाडी येथील बिल्डिंगमध्ये घुसून घरफोडी करणाऱ्या सांगली येथील सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अलिबागच्या पोलिसांनी फिल्मी स्टाईलने अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरी केलेले १० तोळे सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली होंडा कार ताब्यात घेण्यात आली आहे. या सराईत दरोडेखोरांवर राज्यात एकूण २९ गुन्हे दाखल आहेत.



७ जुलै रोजी दुपारच्या वेळेत पेण शहरातील चिंचपाडामधील जगदंबा सिद्धी अपार्टमेंट व रामवाडी येथील साई सृष्टी अपार्टमेंट या बिल्डिंगमध्ये घुसून स्क्रु ड्रायव्हरच्या सहाय्याने दरवाजाची कडी तोडून घरात घुसून घरफोडी करणाऱ्या सांगली येथील सराईत गुन्हेगार लोकेश रावसाहेब सुतार (वय ३०) व अरुण वसंत पाटील वय (२६) (दोन्ही रा. लिंगनूर, ता. मिरज, जि. सांगली) यांना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग अलिबागच्या पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पाठलाग करत अटक केली आहे. गुन्हेगार हे नगर, मुरबाड, कल्याणमार्गे पनवेलवरून पेण येथे चोरी करण्यासाठी दाखल झाले. त्यांनी चिंचपाडा व रामवाडी येथे रेकी करून वरील दोन्ही बिल्डिंगमधील बंद असलेल्या फ्लॅटमध्ये घुसून घरफोडी केली. त्यांनी तीन लाख २९ हजार रुपयांचे १० तोळे सोने चोरले. घरफोडी केल्यानंतर महाड, महाबळेश्वरमार्गे चोर सांगली येथे पळून गेले.

या घरफोडीचा तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अलिबागच्या पोलिसांची एक टीम मिरज, सांगली येथे रवाना झाली. मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज व बातमीदारांच्या माहिती नुसार लिंगनूर गावात दोन दिवस दबा धरून तपास करीत असताना या चोरांनी फिल्मी स्टाईलने घरांवरून उड्या मारीत पळण्याचा प्रयत्न केला व एका खंडरमध्ये जाऊन लपले. या वेळी अलिबाग पोलिसांनी सापळा रचून कसोशीने शोध घेऊन चोरांच्या मुसक्या आवळल्या.

अलिबाग पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवीत अधिक तपास केला असता त्यांच्याकडून चोरी केलेले तीन लाख २९ हजार रुपयांचे १० तोळे सोने व दरोड्यात वापरण्यात आलेली आठ लाख किंमतीची (एमएच १० डीजी ६७७४) होंडा कार असे एकूण १० लाख ८२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. या दरोडेखोरांवर राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी २९ गुन्हे दाखल आहेत.

पेण येथे झालेल्या सदर घरफोडीचा तपास रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशाने व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अलिबाग पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उप निरीक्षक धनाजी साठे, पोलीस हवालदार जितेंद्र चव्हाण, विकास खैरनार, पोलीस शिपाई लालासो वाघमोडे यांनी केला आहे. आपल्या आयुष्यभराच्या कष्टाचे सोन्याचे दागिने फक्त चार दिवसांत मिळाल्याने रायगड पोलिसांचे कौतुक होत आहे.

# माणगाव बसस्थानकात खड्डे व चिखलातून प्रवाशांची पायपीट

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील महत्त्वाचे असणाऱ्या माणगाव बसस्थानकात गेले अनेक दिवस प्रवाशांना खड्डे व चिखलातून पायपीट करावी लागत आहे.



याबाबत युवासेना दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले होते. त्यानंतर आमदार भरत गोगावले यांनी पाठपुरावा करीत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून निधी उपलब्ध करून घेतला होता. बसस्थानकातील काँक्रीटीकरणासाठी १६ लाख रुपये मंजुर करुन घेतला. हा निधी अपुरा पडल्याने उर्वरित काम दुसऱ्या टप्यात केले जाईल, असे आश्वासन आमदार गोगावले यांनी दिले होते, मात्र उर्वरित निधी उपलब्ध झाला नसल्यामुळे बसस्थानकात खड्डे पडले असून नागरिकांना या खड्डे व पावसाळ्यातील चिखलातूनच पायपीट करावी लागत आहे.

युवासेना दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी सांगितले की, प्रवाशांना सर्व पायाभूत सुविधा मिळण्यासाठी शिवसेना पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले यांनी निधी मंजुरीची प्रक्रिया प्रगतीपथावर असून येत्या १५ ते २० दिवसांच्या आत निधी मंजूर होऊन निविदा प्रक्रियेला सुरुवात होईल, असे आश्वासन दिले आहे.

## प्रा. उल्हास बापट यांचे आज अलिबागेत व्याख्यान

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग प्रेस आसोसिएशन यांच्यातर्फे शनिवारी (दि. १५) घटनतज्ज्ञ प्रा. उल्हास बापट यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

आदर्श भुवन, अलिबाग येथील सभागृहात शनिवारी सायंकाळी ५ वाजता हे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. भारतीय राज्यघटना आणि संसदीय लोकशाही हा प्रा. उल्हास बापट यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. व्याख्यानात प्रवेश सर्वांना खुला आहे. या व्याख्यानासाठी जास्ती जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.

## पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात डीएलएलई. युनीट, एनएसएस युनीट व अलिबाग जिल्हा रुग्णालय व यांच्या संयुक्त विद्यमान रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी पेण एज्युकेशन सोसायटीचे ॲड. बापूसाहेब नेने, माजी कार्याध्यक्ष बापूराव आठवले, प्राचार्य डॉ. सदानंद धारप, माजी प्राचार्य पोरे, डीएलएलई युनिटचे जिल्हा समन्वयक डॉ. देवीदास बामणे, एनएसएस युनिटचे डॉ. तुकाराम माळवे, डॉ. सुभाष लकडे, प्रा. एस. एस. पितळे, विद्यार्थी उपस्थित होते.

अनेक विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी व पालकांनी रक्तदान केले, तसेच पेण ग्रामीण रुग्णालयातील मंदा पाटील यांनी रक्तदात्यांची एचआयव्ही टेस्ट केली. सर्व रक्तदात्यांना बापूसाहेब नेने यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

**शासकीय अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, पनवेल.**

**पाहिजेत**

अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, पनवेल साठी निव्वळ कंत्राटी पद्धतीने अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात भरती करणेसाठी खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | संख्या | किमान पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | अधिक्षक | १ | कोणत्याही शाखेचा पदवीधर व संगणक ज्ञान | महिला उमेदवार राखीव |
| २) | लिपिक | १ | दहावी पास टंकलेखन व संगणक ज्ञान आवश्यक | महिला उमेदवार राखीव |
| ३) | शिपाई | १ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ४) | सफाई कामगार | १ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ५) | वॉचमन | १ | किमान चौथी पास | - |


सदरहू पदांकरिता कंत्राटी पद्धतीने मानधन शासन निर्णय / वसतिगृह - २०१२ / प्र.क्र.-१६८ / का. ८ मंत्रालय मुंबई. २१/०६/२०१३ अन्वये राहील. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (mdd.maharashtra.gov.in) वर उपलब्ध आहे. संपूर्ण अर्ज माहितीसह तसेच साक्षांकित प्रमाणपत्रासह स्वीकारण्याचा **अंतिम दिनांक २८ जूलै २०२३** असून मुलाखतीसाठी रविवार **दि. ३०/०७/२०२३** रोजी **सकाळी ११.०० वाजता** उपस्थित राहावे.

Sd/-
CHAIRMAN
Minority Girls Hostel

पत्ता खालीलप्रमाणे
शासकीय अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह,प्राचार्य,
शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल परिसर
(Govt. B.Ed College), NH4, एस.टी. स्टैंड जवळ, पनवेल.



**नागोठणे : महावितरण नागोठणे शाखेचे प्रमुख विद्युत सहाय्यक अभियंता नितीन जोशी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचे महावितरणचे कंत्राटदार विनोद धामणे, कोंडगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच निखील मढवी व महावितरण नागोठणे शाखेचे सर्व कर्मचारी यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.** (छाया : राज वैशंपायन)



**माणगाव : मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी करण्याकरिता आलेले राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण व भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचे माणगावमध्ये भाजपचे ज्येष्ठ नेते संजयआप्पा ढवळे, शहराध्यक्ष नितीन दसवते, जिल्हा युवा मोर्चाचे अमित घाग, चिन्मय मोने, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, तालुकाध्यक्ष उमेश साटम, ॲड. रातवडकर यांनी स्वागत केले.** (छाया : सलीम शेख)

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे पिसार्वे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन व विद्यमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे

**जमिनीचे वर्णन**
**मौजे पिसार्वे ता. पनवेल, जि.- रायगड**

| भूमापन/ गट/सर्व्हे क्र. | उपविभाग क्र. | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| १०५ | १/२/अ | भोगवटादार वर्ग-१ | १-३२-०० ला.ला. ०-१४-१० पो.ख. | २८.४४ |
| | | | **१-४६-१० एकूण** | |

वरील एकूण मिळकतीपैकी खालील वर्णन केल्याप्रमाणे कब्जेदाराचे नाव व त्यांचा हिस्सा

| कब्जेदारांचे नाव | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|
| **श्री. सोमवार माया महादे** | **०-५०-१०** |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही दान, गहाण, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासाहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

पनवेल,
दि. ३०/०६/२०२३

**(सतिश बाळाराम गवते )**
**वकील**

पत्ता : ऑफिस नं. १४, यशोकिरण को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. फोन नं. ९१३७५००४५१.

# रोह्यात आपत्ती प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**रोहे : प्रतिनिधी**

अपघात प्रसंगी पोलिसांची वाट न पाहता प्रथम अपघातग्रस्तांना सर्वतोपरी रुग्णालयात पोहोचविण्यास मदत करावी. त्यामुळे वेळेत डॉक्टरांकडून उपचार झाल्याने रुग्णांचे प्राण वाचवण्यास मदत होते. हीच खऱ्या अर्थाने समाजसेवा होय, असे रोहा पोलीस ठाणे व श्री विवेकानंद रिसर्च सेंटरने आयोजित एक दिवसीय आपत्ती प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी डीवायएसपी सोनाली कदम यांनी व्यक्त केले.



या वेळी एक्सल कंपनीचे उपमहाव्यवस्थापक संजय सपाटे, आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ रायगड भूषण जयपाल पाटील, कंपनी व्यवस्थापक हसाराम मंचेकर, योगशिक्षक सुहास गाणु, फायर एक्सपर्ट संदीप ढापरे, रोहा पोलीस पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर आदी उपस्थित होते. पोलीस पाटील, रोहा पोलीस कर्मचारी यांना जयपाल पाटील यांनी प्रशिक्षण दिले आहे. जयपाल पाटील यांनी कार्यक्रमाची राष्ट्राचे संविधान वाचन प्रशिक्षणार्थींकडून करून घेतले. यानंतर योगशिक्षक सुहास गाणु यांनी योगाचे माहिती व प्रात्यक्षिक केले. आगी संबंधित माहिती, तोटे, औद्योगिक आग आणि घर परिसर आग, याची सखोल माहिती जे. एस. डब्ल्यू साळावचे निवृत्त फायर अधिकारी संदीप ठाकरे यांनी दिली. प्रात्यक्षिक दुपारच्या सत्रात दाखविले. यानंतर जयपाल पाटील यांनी अपघात झाल्यास सर्वात प्रथम १०८ रुग्णवाहिकेस बोलवावे व पोलीस ठाण्यास कळवावे.आपल्या महिलांच्या सुरक्षेसाठी कायम पोलीस दल कार्यरत असून यासाठी आपण ११२ क्रमांकाचा वापर केल्यास नजीकच्या पोलीस ठाण्यातून बीट अंमलदार किंवा महिला पोलीस आपल्या रक्षणासाठी हजर होते.

या वेळी याचे प्रात्यक्षिक दाखवितात रोहा पोलीस ठाण्यातून आशुतोष म्हात्रे उपस्थित राहून माहिती दिली. प्रात्यक्षिक देताना रायगड दक्षिण १०८च्या प्रमुख कांचन बिडवे यांना संपर्क साधताच. २० मिनिटांत डॉ. रश्मी घुगे व पायलट सचीन हे उपस्थित झाले. उपस्थितांना डॉ. रश्मी घुगे यांनी सीपीआरची माहिती व प्रात्यक्षिक दिले.

या कार्यक्रमाचा लाभ ५५ कर्मचारी अधिकारी यांनी घेतला. मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. पाणी वाचवा, झाडे लावा आणि जगवा, असा संदेश देऊन जिल्हाधिकारी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक जिल्हा शल्य चिकित्सक एक्सेल कंपनीचे आभार जयपाल पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन फायर अधिकारी सुदाम करपे यांनी केले, तर आभार सुशील रुळेकर यांनी मानले.

## रायगड जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघाची सभा

**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सेवाभावी संघाची जिल्हा कार्यकारी मंडळाची सभा जिल्हाध्यक्ष तुकाराम खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नागोठणे येथे झाली.

प्रारंभी जिल्हा सरचिटणीस रमेश लखीमले यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन करून वृत्तांसह जमाखर्चास मंजुरी घेतली व माहिती दिली. जिल्हाध्यक्ष खांडेकर यांनी, शिक्षकांच्या पेन्शनचा प्रश्न मार्गी लावल्याचे सांगून शासनाचे आभार मानले.

यानंतर सेवानिवृत्त शिक्षकांना शासनाच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे दरमहा ३० तारखेच पेन्शन मिळावी, थकीत संगणक रक्कम परत मिळावी, जिल्हा प्रशासनाकडून हरविलेल्या सेवा पुस्तकांचा शोध घ्यावा, दुय्यम सेवा पुस्तकास मान्यता मिळावी, वंचित शिक्षकांची निवड श्रेणी मंजूर व्हावी तसेच इतर जिल्हा परिषदेकडून येणारी देणी मिळावी अशा विषयांवर चर्चा करून इतर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. या सभेस जिल्हा सल्लागार वसंत शिंदे, रघुनाथ पाटील, उपाध्यक्ष विनाय सोनकर, तालुकाध्यक्ष मारुती कासार, लक्ष्मण दांडेकर, नामदेव म्हात्रे, गजानन गुरव आदी सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित होते.



## निवडक

### स्वामी समर्थ मठात रक्तदान शिबिर



**नवी मुंबई :** श्री स्वामी समर्थ सेवा ट्रस्ट आणि रायगड ब्लड बँक यांच्या सहकार्याने जुईनगर सेक्टर २५ येथील श्री स्वामी समर्थ मठात गुरुवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सुमारे ५० बॉटल रक्त संकलन करण्यात आले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष संतोष सुतार, सचिव प्रदीप पाटील यांचे मोलाचे योगदान लाभले.

### सफाई कामगारांना साहित्याचे वाटप



**मोहोपाडा :** ग्रुप ग्रामपंचायत वडगाव आणि मेसर्स एचपीसीएल लिमिटेडच्या माध्यमातून स्वच्छता पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायतीच्या सफाई कर्मचाऱ्यांना प्रत्येकी एक रेनकोट, गमबुट, हॅन्ड ग्लोव्हज्, नोज मास्क व ग्रामपंचायतीस दोन डस्टबिनचे वाटप करण्यात आले. या वेळी कंपनीचे मॅनेजर रोहित, इतर सहकारी हेमंत कुमार, प्रशांत सावंत, प्रवीण लबडे, सरपंच गौरी गडगे, ग्रामविकास अधिकारी रश्मी शिंदे, ग्रामपंचायत सदस्य महादेव गडगे, राजेश पाटील, इंजिनियर विजय चौधरी, आरोग्य कर्मचारी महेश तांबडे, गजानन बडदाडे, तसेच सामाजिक कार्यकर्ते दशरथ पाटील, संदीप शिंदे उपस्थित होते.

### गरजूंना शैक्षणिक साहित्य मदत

**नवी मुंबई** : आसावरी शेठ चॅरिटेबल ट्रस्ट, अंधेरीमार्फत विश्वस्त किशोर श्रॉफ व मुकुंद देशमुख यांच्या हस्ते विद्याभवन शैक्षणिक संकुल नेरूळ येथील २५ गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच वाटप करण्यात आले. या वेळी मुकुंद देशमुख म्हणाले, खूप शिका, कोणत्याही शैक्षणिक क्षेत्रात अडचण आली की, आम्ही तुम्हाला आर्थिक मदत करू. सर्वांचे चांगले आरोग्य राहण्यासाठी आरोग्य सुविधा व अन्नधान्याची सुविधा आम्ही देवू असे आश्वासित केले. विश्वस्त किशोर श्रॉफ यांनी विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे संचालक दिनेश मिसाळ यांनी नाशिक वसतिगृहास अन्नधान्य व नेरूळच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत दिल्याबद्दल ट्रस्टचे आभारले. या वेळी मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, राजकुमारी इंदलकर, श्रीजा नायर, मनीषा मुळीक तसेच समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका अस्मिता सलगर, सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



# रस्ते सुरक्षा उपाययोजनांचा आयुक्तांकडून आढावा

## स्पीड ब्रेकर्स नियमावलीनुसार बनविण्याचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

रस्ते सुरक्षिततेच्या दृष्टीने नवी मुंबई महापालिका, वाहतुक पोलीस, प्रादेशिक परिवहन कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग अशा सर्व प्राधिकरणांनी परस्पर समन्वय राखून आवश्यक उपाययोजना कराव्यात व त्या करतांना अपघातप्रवण क्षेत्राकडे विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश देत नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी रस्त्यांवर टाकल्या जाणाऱ्या स्पीड ब्रेकरच्या तांत्रिक तपशीलाचीही बारकाईने तपासणी करावी व स्पीड ब्रेकर्स हे नियमावलीनुसार प्रमाण आकारमानातच असावेत, अशा सूचना दिल्या.



नवी मुंबई शहरातील अपघातप्रवण क्षेत्रात सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी डीआयएमटीएस यांच्या अहवालानुसार महानगरपालिकेच्या वतीने गठीत करण्यात आलेल्या विशेष समितीच्या आढावा बैठकीवेळी समितीचे अध्यक्ष तथा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी या अनुषंगाने झालेल्या व सुरू असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला.

या वेळी समिती सदस्य शहर अभियंता संजय देसाई, वाहतूक पोलीस उपआयुक्त तिरुपती काकडे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगी पाटील, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील व शिरीष आरदवाड, आयआयटी मुंबईचे तज्ज्ञ प्रा. के. व्ही. के. राव, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रतिनिधी समिती सदस्य प्रा. मंजुला देवी तसेच नवी मुंबई महापालिकेचे सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

नवी मुंबईतील पामबीच मार्ग हा वाहन चालकांचा पसंतीचा रस्ता म्हणून सुपरिचित आहे. तथापि या रस्त्यावर होणारे अपघात हा चिंतेचा विषय असून या अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी नवी मुंबई महापालिका वाहतूक पोलिसांच्या सहयोगाने प्रयत्नशील आहे. याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याच्या रस्ते सुरक्षा समितीच्या मागील बैठकीत विस्तृत चर्चा करण्यात येऊन पामबीचसह शहरातील इतर अपघातप्रवण जागांची आयआयटीमार्फत शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यात येऊन आवश्यक उपाययोजना सूचविण्यात आल्या होत्या. त्या सूचनांनुसार महापालिकेमार्फत तत्परतेने कार्यवाही सुरू करण्यात आली.

मागील वर्षभरात अपघातांची संख्या कमी होऊन त्या उपाययोजनांची फलश्रुतीही निदर्शनास आली. याविषयीची सविस्तर आकडेवारी वाहतूक पोलीस उपआयुक्त तिरूपती काकडे यांनी सादर केली.

वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने नवी मुंबई महापालिकेने ८८पैकी ६३ चौकांच्या काँक्रिटीकरणाची कामे पूर्ण केली असून १५ कामे प्रगतीपथावर असल्याची माहिती शहर अभियंता संजय देसाई यांनी दिली. त्याचप्रमाणे शहरातील चार अपघातप्रवण जागा तसेच इतर महत्त्वाच्या जागांवर वाहतूक पोलीस विभागाशी समन्वय राखून आवश्यक सिग्नल यंत्रणा वाढ व सक्षमीकरण, रस्त्यांवर टेबल टॉप क्रॉसिंग, लेन मार्कींग, जॉमेट्री इम्प्रुव्हमेट, स्पीड ब्रेकर अशा उपाययोजना करण्यात आल्याचीही माहिती त्यांनी दिली. शहरात सायकलसारख्या प्रदूषणविरहित वाहन वापराला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने १०० किमी सायकल ट्रॅकचे नियोजन असल्याची माहिती देत त्यांनी २१ किमी सायकल ट्रॅकची निर्मिती करण्यात आली असल्याचे सांगितले.

### वाहनचालकांनीही सहकार्य करावे

कोणताही अपघात हा त्या व्यक्तीवर व त्याच्या कुटुंबावर होणारा फार मोठा आघात असून प्रत्येकाने वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करून वाहन चालविणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मनपा वाहतूक पोलीस विभागाच्या सहकार्याने आवश्यक उपाययोजना करीत आहे. यामध्ये वाहनचालकाची जबाबदारी अतिशय महत्त्वाची असून वेगमर्यादेचे पालन करीत व वाहतुकीच्या सर्व नियमांचे पालन करून प्रत्येकाने सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## कळंबोलीत अल्पवयीन मुलीवर बापाकडून अत्याचार

**कळंबोली : प्रतिनिधी**

कळंबोली शहरात एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बापानेच अतिप्रसंग केल्याची धक्कादायक घटना समोर आलेली आहे. ३४ वर्षीय बापाने आपल्या १३ वर्षीय पोटच्या मुलीवर अतिप्रसंग केला आहे. या सर्व प्रकारानंतर एक नाट्यमय चित्र पोलिसांसमोर उभे करण्यात आले होते, मात्र कळंबोली पोलिसांनी सात दिवसांत या गुन्ह्याचा छडा लावला आहे.




यातील मुख्य आरोपी असलेला मुलीचा स्वतः बापच असल्याचे समोर आले व आरोपी बापावर पोक्सो अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. कळंबोली स्टील मार्केट परिसरातील खिडूकपाडा येथील गोडाऊन प्लॉट ८६५ या ठिकाणी असलेल्या स्टील पाईपच्या गोडाऊनमध्ये रहात असलेले आरोपी राम गोपाल पारसनाथ राव (वय ३८) आपल्या बायको, एक मुलगा व मुलगी यांच्या सह कुटूंबासोबत राहतात. यांचे मूळ ठिकाण उत्तरप्रदेश येथील आहे.

आरोपी रामगोपाल पारसनाथराव याने आपल्या १३ वर्षीय मुलीवर वारंवार प्रसंग करीत आल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. पीडित १३ वर्षीय अल्पवयीन मुलीला मागील काही दिवसांपूर्वी आरोग्याच्या दृष्टीने त्रास सुरू झाला. त्यात तिला पोटदुखी व चक्कर असा त्रास असल्याने तिला पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी डॉक्टरांनी उपचाराबाबत तिची तपासणी केली असता ती गरोदर असल्याचे लक्षात आल्याने संबंधित कळंबोली पोलीस स्टेशनला याबाबत कळवण्यात आले होते.

याबाबत कळंबोली पोलिसांनी या गुन्ह्यांचा तपास करायला सुरुवात केली. सुरुवातीला पोलिसांना पीडित मुलीकडूनदेखील चुकीची माहिती पुरवण्यात आली होती. तपासादरम्यान असे लक्षात आले की, यामध्ये पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रकार सुरू आहे. त्यामुळे पीडित मुलाचे आई-वडिलांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर चौकशीदरम्यान पीडित मुलीचे आरोपी वडील राम गोपाल पारसनाथराव यांनी आपण आपल्या मुलीसोबत अतिप्रसंग केल्याचे कबूल केले.

आरोपी राम गोपाल पारसनाथ याच्यावर पॉक्सो अंतर्गत कारवाई केली आहे. त्याच्यावर कलम ३७६/६,८,१२ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

## पाण्यासाठी सारसोळे ग्रामस्थ धडकले विभाग कार्यालयात

**नवी मुंबई : बातमीदार**

सारसोळे गाव से. ६मधील काही भागात पाणीपुरवठा सुरळीत होत नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. अखेर पाणी प्रश्नी सारसोळे ग्रामस्थ आक्रमक झाले असून त्यांनी बुधवारी (दि. १२) पालिका अधिकाऱ्यांनाच घेराव घालत जाब विचारला, तसेच येत्या दोन दिवसांत पाणीपुरवठा झाला नाही, तर सर्व ग्रामस्थ विभाग कार्यालयातच स्वयंपाक करतील, असा इशारा देण्यात आला. नागरिकांच्या या आक्रमक भूमिका पाहता अधिकाऱ्यांनी तातडीने पाणी प्रश्न सोडवला जाईल, असे आश्वासन दिले.

स्वतःचे मालकी धरण असलेली महापालिका म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेची ओळख आहे, मात्र मागील काही दिवसांपासून शहरातील बऱ्याच भागात अनियमित पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. याबाबत पालिकेवर कायम आरोप होत आहेत. नेरूळमधील से. ६, सारसोळे भागात देखील पाण्याची वानवा सुरू आहे. सध्या धरणाची पातळी ७० मीटरपेक्षा जास्त असली तरी पाण्याचा तुटवडा का? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. याच अनुषंगाने येथील स्थानिकांनी नेरूळ विभाग कार्यालयात अधिकाऱ्यांना घेराव घालत जाब विचारला.

यावर एका दिवसात तुमच्या भागातील पाणी येईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले, मात्र ही समस्या तत्काळ नाही सुटली तर आम्ही घरातील भांडी आणून विभाग कार्यालयातच जेवण बनवू, असा इशारा पालिका अधिकाऱ्यांना देण्यात आला.



# कागदी पिशवी दिनानिमित्त विद्यार्थ्यांची विशेष कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिकमुळे व त्यातही प्लास्टिक पिशव्यांच्या वापरामुळे पर्यावरणाची होणारी हानी लक्षात घेता प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णपणे टाळून त्याऐवजी कापडी किंवा कागदी पिशव्यांचा वापर करण्याबाबत नवी मुंबई महापालिकेच्या वतीने नियमितपणे जनजागृती करण्यात येत असते.



या अनुषंगाने जागतिक कागदी पिशवी दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने सेक्टर ४, सानपाडा येथील विवेकानंद संकुल शाळेत विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून कागदी पिशव्या बनविणे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या नियंत्रणाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कागदी पिशव्या बनविणे कार्यशाळेत २००हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होत कागदी पिशव्या बनविण्याची प्रक्रिया शिकून घेतली आणि प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कागदी अथवा कापडी पिशव्यांचा वापर करू, अशी एकत्रितपणे शपथ घेतली.

या वेळी मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिक बंदीविषयी तसेच प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून त्याऐवजी कागदी व कापडी पिशव्यांचा पर्याय निवडावा याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या घरात व त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत प्लास्टिकचे दुष्परिणाम पोहोचवून त्यांना कापडी अथवा कागदी पिशव्या वापरण्यास प्रोत्साहित करण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले.

नवी मुंबई महापालिका याविषयी सजग असून महानगरपालिकेने समाज माध्यमांवरून जागतिक कागदी पिशवी दिनाचे महत्त्व प्रसारित करणारे संदेश प्रसारित केले आहेत तसेच विविध कार्यक्रमही हाती घेतले आहेत. विवेकानंद संकुल, सानपाडा येथे झालेल्या कापडी पिशव्या बनविणे प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्दिष्टही हेच असून या माध्यमातून नव्या पिढीत विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदूषणाविषयी तसेच कापडी पिशव्यांच्या वापरामुळे होणारे लाभ याबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे.

### ...म्हणून साजरा होतो हा दिवस :

१२ जुलै १८५२मध्ये अमेरिकेत फ्रान्सिस ओले यांनी पहिल्यांदा कागदी पिशवी बनविली. त्याचे स्मरण म्हणून १२ जुलै हा दिवस संपूर्ण जगभरात जागतिक कागदी पिशवी दिन म्हणून साजरा केला जातो. कागदी पिशव्यांचा वापर करणे ही समाजहिताची गोष्ट असून प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण व नैसर्गिक वातावरणाला निर्माण होणारा गंभीर धोका याविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी या दिवशी जगभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.

## चिरनेर परिसरात शेतीच्या कामांना वेग

**उरण : वार्ताहर**

मागील काही दिवसांपासून बरसत असलेल्या पावसामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण असून, शेतीच्या कामांना वेग आला आहे.



उरण व पनवेल तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, साई, दिघाटी, नागाव, केगाव, चाणजे या गावातील परिसरात भात लावणीच्या कामांना सुरुवात झाली आहे.

सुरुवातीला आपल्या आगमनाची चाहूल देणाऱ्या पावसाने रायगडकरांना हुलकावणी दिली होती. अधून मधून पडणाऱ्या किरकोळ सरींमुळे भातरोपांनी तग धरून ठेवला होता. तर काही भात रोपांची उगवणही झाली नव्हती.

अशा अवस्थेत भातरोपांची स्थिती असतानाच, काही दिवसांपूर्वी पावसाने जिल्ह्यात हजेरी लावून, बरसायला सुरुवात केली. त्यामुळे सर्वत्र शेतात चांगले पाणी झाले असून, शेतीच्या कामांना वेग आला आहे.

भात रोपांची चांगली वाढ झाली आहे. चिखलणीसाठी जमीन हलकी झाल्याने शेतकऱ्यांनी नांगरणी करून भातरोपांच्या लावणीलाही सुरुवात केली आहे. उरण, पनवेल तालुक्यातील महिलावर्ग सध्या लावणीच्या कामात मग्न झाला आहे.

पूर्वी लावणीची कामे करत असताना, विरूंगळा म्हणून पारंपरिक गाणी गाऊन, त्यातून देवाची आळवणी केली जात होती. अशा गाण्यांना आंबोळ्या असे संबोधले जाते. या आंबोळ्यांचे सूर आता खलाटचांमध्ये ऐकू येत नाहीत, ही वस्तूस्थिती आहे.

## लसूणच्या भाववाढीने किचन बजेटवर परिणाम

**पनवेल : वार्ताहर**

बाजारात टोमॅटो, वाटाणा आणि मिरची यांच्या दरात स्पर्धा रंगली असताना लसणानेदेखील भाव खाण्यास सुरुवात केली आहे. घाऊकमध्ये १८० रुपये प्रतिकिलो दराने उपलब्ध असलेल्या लसणाने किरकोळ बाजारात द्विशतक पार केले असून २१० ते २३० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होत आहे. त्यामुळे जेवणातील फोडणी महाग झाली आहे.

पनवेलमधील कांदा-बटाटा घाऊक बाजारात लसूण दर १७५ ते १८० रुपये प्रतिकिलो पोहोचला आहे. तर किरकोळ बाजारात २१०-२३० रुपयांपर्यंत लसूण दराने मजल मारली आहे. यंदा लसूण लागवड कमी आहे. शिवाय समाधानकारक पाऊस नसल्याने मागील दोन महिन्यांपासून सातत्याने लसूण दर वधारत आहेत.

एप्रिलपासून शेतकऱ्यांनी लसूण उत्पादन कमी आहे. त्यामुळे बाजारात लसूण आवक घटली आहे. गेल्या एप्रिल-मे मध्ये लसूण दरात किरकोळ वाढ झाली होती, मात्र, जून-जुलैमध्ये लसून दर कडाडण्यास सुरुवात झाली आहे. आता जुलैमध्ये टोमॅटोपेक्षाही लसून दराने उच्चांक गाठला आहे.

समाधानकारक पाऊस नसल्याने लसून उत्पादन घटत आहे. त्यामुळे लसूण दरात वाढ होत आहे. पावसाने यापुढेही दडी मारली तर लसूण आणखी महागण्याची शक्यता असल्याचे मत लसूण व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

# दुर्गम गावात अन्नधान्याची तजवीज

## पावसाळ्यात पुरेल इतके धान्य प्रशासनाकडून उपलब्ध

**अलिबाग : प्रतिनिधी**

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे दुर्गम गावातील नागरिकांची अन्नधान्याअभावी आबाळ होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाने गावातील कुटुंबांना सप्टेंबर महिन्यापर्यंत पुरेल इतके धान्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. जिल्ह्यात दोन हजार क्विंटल गहू आणि पाच हजार क्विंटल तांदळाचा पुरवठा करण्यात आला आहे.

दुर्गम डोंगराळ भागात वसलेल्या गावात पावसाळ्याच्या दिवसांत वाहतूक व्यवस्था बंद असते. कधी कधी अतिवृष्टीमुळे नदी-नाल्यांना पूर येऊन अशा गावांचा बाजारपेठांशी संपर्क तुटतो. अशावेळी त्यांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध व्हावे यासाठी पावसाळ्यापूर्वीच त्या गावात धान्याचा पुरेसा साठा करून ठेवण्यात येतो. पावसाळा संपेपर्यंत पुरेल इतका धान्यसाठा उपलब्ध करून दिला जातो. रायगड जिल्ह्याचा विचार केला तर जिल्ह्यातील दुर्गम डोंगराळ भागात आदिवासी समाजाची वस्ती आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला भात लागवडीची कामे संपल्यानंतर त्यांना साधारण दसऱ्यापर्यंत रोजगार उपलब्ध नसतो. अशावेळी या कुटुंबांचे अन्धान्याअभावी कुपोषण होऊ नये यासाठी राज्य सरकारने नवसंजीवनी योजना सुरू केली आहे. त्यानुसार पावसाळा सुरू होण्यापूर्वी या कुटुंबांना धन्याचा पुरवठा केला जातो.



(संग्रहित छायाचित्र)

**अंत्योदय योजना (धान्य वाटप क्विंटल)**

| अंत्योदय कार्डसंख्या | लोकसंख्या | गहू | तांदूळ |
|---|---|---|---|
| ३,०६८ | १०,२९१ | १२०५.४ | ३०११.२५ |

**प्राधान्य कुटुंब (धान्य वाटप क्विंटल)**

| कार्डसंख्या | लाभार्थी संख्या | गहू | तांदूळ |
|---|---|---|---|
| ४००३ | १५,३१२ | ९७०.३४ | २०१९.०६ |

या वर्षी रायगड जिल्हयात अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेतंर्गत अशा प्रकारे धान्याचा पुरवठा करण्यात आला आहे. यामध्ये महाड तालुक्यातील सर्वाधिक १६ गावांचा समावेश आहे. त्या खालोखाल पेण तालुक्यात १४ गावांमध्ये धान्यपुरवठा करण्यात आला आहे. उरण तालुक्यातील घारापुरी बेटावरील नागरिकांनादेखील ऑगस्ट अखेर पुरेल इतके धान्य वितरीत करण्यात आले आहे. कर्जतमधील माथेरान, सुधागडमधील सिद्धेश्वर खुर्द, उसर तर रोह्यातील पांगळोली कालकाई ही गावे या योजनेत समाविष्ट असून त्यांनादेखील तीन महिन्यांच्या धान्याचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे यांनी दिली.

# लव्हेज ग्रामस्थांचा विहारीच्या माध्यमातून सामाजिक सद्भाव



(छाया : अरूण नलावडे)

## तहसीलदारांनी केले कौतुक

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली शहराचे उपनगर असलेल्या लव्हेज गावालगतच्या माळरानावरची ऐतिहासिक दगडी बांधणीची विहिर अस्पृशांसह सर्वत्रांस खुली या सामाजिक संदेशाने सर्वदूर चर्चेत आली आहे. या विहिरीचे संवर्धन आणि साफसफाई करणाऱ्या ग्रामस्थांचे कौतुक करण्यासाठी लव्हेज येथील वासुदेव बळवंत फडके शाळा सभागृहात खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी उपस्थित होते.

सामाजिक सद्भाव जपण्याच्या हेतूने शेकडो वर्षांपूर्वी अस्पृशांसह सर्वत्रांस खुली असा ऐतिहासिक संदेश देणाऱ्या लव्हेज गावातील तत्कालीन समाज सुधारकांचा आदर्श आजदेखील प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन करताना त्यांनी दर्शविलेल्या पदपथावर सर्वांनी मार्गक्रमण केले पाहिजे, असे आवाहन तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले. कार्यक्रमाचे साक्षीदार झाल्याचा स्वतःला अभिमान वाटतो आहे असे सांगून असा जाज्वल्य वारसा जपणाऱ्या ग्रामस्थांचे त्यांनी कौतुक केले.

लव्हेज ग्रामस्थांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमास नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खोपोली नगरपालिकेचे मुख्याधिकारी अनुप दूरे, खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शितलकुमार राऊत, सहाय्यक निरीक्षक हरेश काळसेकर, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे गुरूनाथ साठेलकर उपस्थित होते.

ऐतिहासिक विहिरीची पाहणी केल्यानंतर त्या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास बहुसंख्य लव्हेजकर बंधू-भगिनींनी गर्दी केली होती. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करीत त्यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# रोहा पालिकेकडून खड्डे, कचऱ्यावर होणार उपाययोजना

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने शहरामध्ये पावसाळ्यात पडलेले खड्डे व ठिकठिकाणी साचलेला कचरा यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे. त्यानुसार लवकरात लवकर खड्डे भरण्यात येतील व ठिकठिकाणी साचलेला कचराही उचलण्यात येईल, असे पालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

रोहा शहरात रोहा एसटी स्टँड प्रवेशद्वार, वीर सावरकर मार्ग, आशीर्वाद हॉटेलसमोर अशा अन्य ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यात काही ठिकाणी पाणी साचते. वाहनचालक, प्रवाशांना अशा रस्त्याचा अंदाज येत नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. याबाबत पालिकेकडे विचारले असता शहरातील खड्डे भरण्यासाठी निविदा काढण्यात आली असून त्याची वर्कऑर्डर निघाली आहे. लवकरात लवकर खड्डे भरण्यात येतील, असे सांगण्यात आले.



(छाया : महादेव सरसंबे)

दुसरीकडे रोहा तहसील मार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयलगत असलेला भाग यासह अन्य ठिकाणी उघड्यावर कचरा पडलेला दिसतो. यातून दुर्गंधी येते. पालिकेच्या वतीने सफाई कामगार व सहा ट्रॅक्टरच्या माध्यमातून कचरा काढण्याचे काम करण्यात येते, मात्र हा कचरा उचलल्यानंतर काही ठिकाणी नागरिक, व्यावसायिक पुन्हा कचरा टाकत आहेत. त्यामुळे अस्वच्छता होते. नागरिक व व्यावसायिकांनी आपला कचरा हा गाडी येईल तेव्हा वेळच्या वेळी द्यावा, असे पालिकेकडून सूचित करण्यात आले आहे.

पालिका हद्दीत निघणारा ओला कचरा हा मच्छी मार्केट येथील बायोगॅस प्लांटमध्ये टाकण्यात येतो. उर्वरित कचरा मालसई येथील डम्पिंग ग्राउंडमध्ये टाकला जातो. या डम्पिंग ग्राउंडमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी अत्याधुनिक कचरा वर्गीकरण करण्यासाठी यंत्रणा बसवण्यात आली आहे. यातून प्लास्टिकसह अन्य साहित्य वेगवेगळे करण्यात येते, तर दुसरीकडे याच ठिकाणी कचऱ्यापासून खत तयार करण्याचा ही काम करण्यात येते. या परिसरात आता झाडे लावण्याचे काम चालू आहे.

रोहा शहरात भेडसणाऱ्या विविध समस्यांवर पालिकेच्या वतीने उपाययोजना करण्यात येत आहेत, पण मुरूड-रोहा मार्गालगत गटाराचे काम अपूर्ण असल्याने शहरात काही ठिकाणी यामुळे पाणी साचत आहे. लवकरात लवकर गटारे पूर्ण झाल्यास ही समस्याही दूर होईल, असे नागरिकांमधून बोलले जात आहे.

# मध्य रेल्वेचे शून्य स्क्रॅप मिशन

## भंगाराच्या विल्हेवाटीतून ८१.६४ कोटींचा महसूल

**रोहे : प्रतिनिधी**

शून्य स्क्रॅप मिशन अंतर्गत मध्य रेल्वेचा प्रत्येक विभाग, कार्यशाळा आणि शेड या भंगार साहित्यापासून मुक्त असल्याचे सुनिश्चित करण्यासाठी अथक प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये जूनमध्ये ३६.३५ कोटी रुपये भंगार विक्री झाली आहे आणि त्यानुसार एप्रिल ते जून २०२३ या कालावधीसाठी एकत्रित विक्री ८१.६४ कोटी आहे, जी एप्रिल ते जून या कालावधीतील उद्दिष्टापेक्षा ३६.०६ जास्त आहे.

मध्य रेल्वेचे भंगार विक्रीचे वार्षिक उद्दिष्ट ३०० कोटी आहे. यामुळे २०२३ साठी पं. गोविंद बल्लभ पंत शिल्डच्या निकषांमध्ये २२ पैकी १० पॅरामीटर्समध्ये मध्य रेल्वे क्रमांक १ वर आली आहे.

भंगाराची विक्री मध्य रेल्वेच्या सर्व पाच विभागांत म्हणजेच मुंबई (माटुंगा कार्यशाळा), पुणे, सोलापूर, भुसावळ आणि नागपूर येथे विविध ठिकाणी करण्यात आली आहे. विकल्या जाणाऱ्या भंगाराच्या प्रमुख वस्तूंमध्ये इएमयू कोच, आयसीएफ कोच, लोकोमोटिव्ह, वॅगन्स आणि इतर भंगाराचा समावेश होतो.

ई-खरेदी प्रणालीमुळे गव्हर्नमेंट ई मार्केट, मध्य रेल्वेवरील एक अनोखी ऑनलाइन ई-खरेदी प्रणाली ऑपरेशनने साहित्य खरेदी आणि संबंधित आर्थिक व्यवहारांमध्ये सहजता आणि पारदर्शकता सुनिश्चित केली आहे. हे एक प्लॅटफॉर्म आहे जे संपूर्ण भारतातील विक्रेत्यांना समान संधी प्रदान करते. तांत्रिक निकषांची बारकाईने तपासणी केल्यानंतर उच्च गुणवत्तेसह सर्वात कमी ऑफर निवडण्यासाठी ते संस्थेला माध्यम देते. यामुळे मध्य रेल्वेच्या महसुलातही मोठी बचत झाली आहे.

एप्रिल ते जून या कालावधीसाठी जीईएमद्वारे खरेदी ११०.८९ कोटी (वस्तूंसाठी ३१.९४ कोटी आणि सेवांसाठी ७८.९५) आहे. या प्रणालीमुळे मटेरियल मॅनेजमेंट सेक्शनने सुरक्षितता आणि प्रवासी सुविधांच्या वस्तूंची १०० टक्के उपलब्धता राखली आहे. त्यामुळे सुरक्षा सामग्रीची कमतरता नाही याची खात्री होत आहे, असे मध्य रेल्वे जनसंपर्क विभाग मुंबईच्या वतीने सांगण्यात आले.



# कमानी कंपनीने जपली सामाजिक बांधिलकी

## नावंढे ग्रामपंचायतीला दिली रुग्णवाहिका व घंटागाडी



(छाया : जयवंत माडये)

> **कमानी कंपनीने दिलेली सर्व सोयीयुक्त रुग्णवाहिका व घंटागाडी नावंढे ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना उपयुक्त ठरणार आहे. सर्व नागरिकांनी रुग्णवाहिका व घंटागाडीचा योग्य वापर करून या दोन्ही गाड्यांची निगा राखणे गरजेचे आहे.**
> **-धीरज तरलेजा, व्यवस्थापक, कमानी कंपनी**

**खोपोली : प्रतिनिधी**

कमानी कंपनीने सीआरएस फंडाच्या माध्यमातून नावंढे ग्रामपंचायतीला रुग्णवाहिका व घंटागाडी भेट दिली. याचा लोकार्पण सोहळा नुकताच ग्रामपंचायत कार्यालयासमोर झाला.

या कार्यक्रमास कामगार नेते हनुमत पिंगळे, मोरडे फूड कंपनीचे हर्षल मोरडे, चंद्रकांत मोरडे, महेश मोरडे, कमानी कंपनीचे धीरज तरलेजा, राहुल गुप्ते, सौम्या मौडल, गणेश डोईफोडे, माजी पं.स.सदस्य अक्षय पिंगळे, सरपंच उषा पिंगळे, उपसरपंच अर्चना पिंगळे, सदस्य श्रीकांत हाडप, संकेत हाडप, प्रकाश पिंगळे, शारदा वाघमारे, शकुन वाघमारे, कांचन हडप, आशा पवार, योगिता कदम, ललिता पिंगळे, अपर्णा पिंगळे, ग्रामसेवक संतोष पवार, कर्मचारी शेखर हाडप व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगाव रोटरी क्लबचा उद्या पदग्रहण समारंभ

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक व शैक्षणिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ माणगाव व रोटरी क्लब माणगाव चॅरिटेबल फाउंडेशनचा २७वा पदग्रहण समारंभ १६ रोजी सायंकाळी ६ वाजता मोतीराम बँक्वेट हॉल येथ आयोजित करण्यात आला आहे.

या पदग्रहण सोहळ्यात सन २०२३-२४ या वर्षाकरिता नूतन कार्यकारणी पदग्रहण करणार आहे. या कार्यक्रमास नियोजित प्रांतपाल शितल शहा या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार असून सहाय्यक प्रांतपाल सूर्यकांत महाडिक हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या वेळी नूतन अध्यक्ष बिपीन दोषी, सचिव निलेश मेथा, खजिनदार हेमंत शेट व कार्यकारिणी सदस्य पदग्रहण करणार आहेत. या कार्यक्रमास निमंत्रितांनी उपस्थित राहून शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माणगाव वनवासी कल्याण आश्रमशाळेत वृक्षारोपण

**माणगाव : प्रतिनिधी**

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या वतीने माणगाव येथील वनवासी कल्याण आश्रम शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या आश्रमशाळेत वनवासी गटातील ४५०पेक्षा अधिक जनजातीय मुले पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण निवासी पद्धतीने घेतात.

शाळेची मूलभूत गरज लक्षात घेऊन मुलींच्या वसतिगृहास बंक बेड तसेच मुलां-मुलींकरिता वॉशिंग व ड्रायर मशीन प्रत्येकी एक संच कंपनीच्या सीएसआर फंडातून आश्रमास उपलब्ध करून देण्यात आले आहे. कंपनी प्रशासनाचे प्रमुख अधिकारी यांनी या आश्रमात भेट देऊन शाळेची पाहणी करीत समाधान व्यक्त केले व यानिमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले.



(छाया : सलीम शेख)

वनवासी कल्याण आश्रम संस्था व शाळा खूप सकारात्मक काम करीत आहे. शिक्षण व ज्ञानाने मागे पडलेल्या समाजाला आपण पुढे आणण्याचा अथक प्रयत्न करीत आहात, असे म्हणत पुढील काळातही शाळेच्या काही मूलभूत गरजांसंदर्भात चर्चा झाली व पोस्को कंपनी याबद्दल सकारात्मक विचार करेल, असे कंपनी प्रतिनिधींनी सांगून शुभेच्छा दिल्या.

# नेणवली शाळेस अ‍ॅण्ड्रॉइड स्मार्ट टीव्ही भेट

**पाली : प्रतिनिधी**

पाली येथील प्रसिद्ध उद्याजक तसेच सिव्हिज अँरोकेम-बलाप येथील कंपनीचे मालक मिलिंद भावे यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या नेणवली शाळेस ४० इंची अ‍ॅण्ड्रॉइड स्मार्ट टिव्ही व शाळेतील दुसऱ्या नॉर्मल टीव्हीकरिता अ‍ॅण्ड्रॉइड बॉक्स भेट दिला. नेणवली येथील ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाचे सुलभीकरण करण्याकरिता इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना त्यांनी ही अनोखी भेट दिली आहे.




(छाया : धम्मशील सावंत)

भावे यांच्यासोबत त्यांची कन्या निवेदिता भावे म्हणजेच डो-टेल्स केक स्टुडिओच्या मालक यांनी खऱ्या अर्थाने ही भेट देण्यास पुढाकार घेऊन शाळेला मदत केली. या भेटीदरम्यान नेणवली शाळेतील विद्यार्थ्यांनी उद्योजक आपल्या भेटीला हा मुलाखतवजा कार्यक्रम घेऊन दोन्हीही मान्यवरांशी सुसंवाद साधला. यामध्ये त्यांचे शिक्षण, कंपनीची स्थापना, उत्पादन, टाकाऊ पदार्थ विल्हेवाट, आवड, छंद ते विद्यार्थ्यांना संदेश असे अभ्यासपूर्ण प्रश्न विचारले आणि त्यास श्री. भावे यांनी दिलखुलास गप्पा मारून कार्यक्रमाची मजा घेतली.

या कार्यक्रमात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किसन कोंडे, उपाध्यक्ष गुलाब वाघमारे, उपसरपंच शांताराम कोंडे, सदस्य महेंद्र पडवळ, इतर सदस्य, मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी मान्यवरांचे वृक्ष भेट देऊन स्वागत केले. विषय शिक्षक रवींद्र हंबीर यांनी सर्वांचे आभार मानले. या वेळी निवेदिता भावे हिने सर्व विद्यार्थ्यांना केकबॉल खाऊवाटप केला.

> **दुर्गम, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानातून आधुनिक शिक्षण सहज मिळावे अन् मुलांनी मोठी स्वप्ने पाहून साकार करावी हेच या भेटीचे फलित ठरेल.**
> **-मिलिंद भावे, सिव्हीज अँरोकेम, पाली**

> **नेणवली शाळेसाठी मिळालेली भेट नक्कीच ऑनलाईन शिक्षणास गुणवत्तापूर्ण दिशादर्शक ठरेल. विद्यार्थ्यांचे शिक्षण सुलभ होईल.**
> **-राजेंद्र अंबिके, मुख्याध्यापक, नेणवली**

# ‘यशस्वी’ पदार्पण करीत रचला इतिहास!

## विंडीजविरुद्ध जैस्वालचे शतक; अनेकांचे विक्रम मोडले

**डॉमिनिका : वृत्तसंस्था**

भारताचा युवा फलंदाज यशस्वी जैस्वालने वेस्ट इंडिजच्या भूमीवर पदार्पणाच्या सामन्यात शतक झळकावले. यासह त्याने अनेक दिग्गज खेळाडूंचे विक्रम मोडले.

पदार्पणाच्या सामन्यातच २१ वर्षीय यशस्वी जैस्वालने पहिल्या डावात शतक झळकावून इतिहास रचला. २१ वर्षीय युवा फलंदाजाने भारताबाहेर पदार्पणाच्या सामन्यात शतक झळकावले. वेस्ट इंडिजमध्ये पदार्पणात शतक झळकावणारा तो पहिला भारतीय सलामीवीर ठरला आहे. त्याच्या आधी सुनील गावसकर यांनी १९७१ साली वेस्ट इंडिजमध्ये पदार्पण केले होते, परंतु पहिल्या सामन्यात त्यांना शतक झळकावण्यात अपयश आले होते. त्याचवेळी २०११मध्ये विराट कोहलीनेही विंडीजच्या मैदानावर पदार्पण केले, पण त्याला शतकही करता आले नाही.

कर्णधार रोहित शर्मानेही कॅरेबियन गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली आणि आपलेही शतक पूर्ण केले. टीम इंडिया आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन कसोटी मालिकेतील पहिला सामना डॉमिनिका येथे खेळला जात आहे. सामन्यातील दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारतीय संघाने पहिल्या डावात २ बाद ३१२ धावा केल्या आहेत. सलामीवीर यशस्वी जैस्वाल (१४३) आणि विराट कोहली (३६) नाबाद होते.

परदेशी भूमीवर सलामीवीर म्हणून शतक झळकावणारा यशस्वी पहिला भारतीय ठरला आहे. यापूर्वी सुधीर नाईकने इंग्लंडमध्ये १९७४मध्ये ७७ धावा केल्या होत्या, तर सुनील गावसकर यांनी पदार्पणाच्या डावात ६५ धावा केल्या. यशस्वीने सर्वांना मागे टाकले आहे. एकंदरीत शिखर धवन आणि पृथ्वी शॉ यांनी पदार्पणाच्या कसोटीत सलामीवीर म्हणून शतके झळकावली आहेत, पण ती शतक मायदेशातील कसोटी मालिकेत आली आहेत.




याशिवाय पदार्पणाच्या कसोटीत शतक झळकावणारा यशस्वी एकूण भारतीयांपैकी १७वा फलंदाज ठरला आहे. म्हणजेच त्याच्या आधी भारताच्या १६ फलंदाजांनी पदार्पणाच्या कसोटीत शतक झळकावले आहे. जर आपण सर्वोत्तम धावसंख्येबद्दल बोललो, तर पदार्पणाच्या कसोटीतील सर्वोत्तम धावसंख्येचा विक्रम धवनच्या नावावर आहे, ज्याने मार्च २०१३मध्ये मोहालीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध १८७ धावा केल्या होत्या. श्रेयस अय्यरने यशस्वीच्या आधीच्या शेवटच्या पदार्पणाच्या कसोटीत शतक झळकावले. त्याने २०२१ मध्ये कानपूर येथे न्यूझीलंडविरुद्ध १०५ धावा केल्या होत्या. लाला अमरनाथ हे भारतासाठी पदार्पणाच्या कसोटीत शतक झळकावणारे पहिले खेळाडू होते. त्यांनी १९३३मध्ये इंग्लंडविरुद्ध ११८ धावा केल्या होत्या.



# ‘आरटीआयएससी’च्या जलतरणपटूंचे सुयश


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एक्वाटिक असोसिएशन ऑफ रायगडच्या वतीने कर्नाळा क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स (आरटीआयएससी)मधील खेळाडूंनी सहभाग घेऊन विविध गटांमध्ये पदके जिंकली.

आरव सिंग, रुजुला सणस, युग म्हात्रे, आदित्य कुमार आणि अनुष्का मीना या जलतरणपटूंनी या स्पर्धेत भाग घेतला. त्यांना स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील प्रशिक्षक प्रभात कोळी आणि निहार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले जात आहे. या खेळाडूंनी एकूण पाच सुवर्ण, तीन रौप्य आणि दोन कांस्यपदके जिंकली. सर्व विजेत्यांचे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील संचालक मंडळातील सर्व सदस्यांनी अभिनंदन आणि कौतुक केले.

# रनमशीन विराट कोहलीने टाकले वीरेंद्र सेहवागला मागे

## कसोटीत सर्वाधिक धावा करणारा पाचवा फलंदाज



**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात डॉमिनिका येथे खेळल्या जात असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात रोहित आणि यशस्वी जैस्वाल यांनी शतके झळकावून विक्रमांची रांग लावली आहे. त्याचबरोबर चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या विराट कोहलीनेही चांगली कामगिरी केली आहे. विराटने या सामन्यात २५वी धाव घेताच माजी क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवागला मागे टाकले आहे. भारतासाठी कसोटीत सर्वाधिक धावा करणारा तो आता पाचवा भारतीय खेळाडू ठरला आहे.

सचिन तेंडुलकर हा भारतीय फलंदाजाकडून कसोटीत सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. त्याने २०० सामन्यांच्या ३२९ डावांमध्ये ५३.७८च्या सरासरीने आणि ५४.०४च्या स्ट्राईक रेटने १५,९२१ धावा केल्या आहेत. या यादीत राहुल द्रविड (१३,२६५ धावा) दुसऱ्या स्थानावर आहे. सुनील गावसकर (१०,१२२ धावा) तिसऱ्या, व्हीव्हीएस लक्ष्मण (८,७८१ धावा) चौथ्या क्रमांकावर आहेत. या यादीत वीरेंद्र सेहवाग ८,५०३ धावांसह पाचव्या स्थानावर होता, पण विराटने आता त्याला मागे टाकत ८,५१५ धावा केल्या आहेत. यासह विराट या दिग्गजांच्या क्लबमध्ये दाखल झाला आहे.

# रोह्यात पावसाळी क्रिकेट स्पर्धा रंगली



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रॉयल मित्र मंडळाच्या वतीने धाटाव येथील तालुका क्रीडा संकुलात पावसाळी रबर बॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. वरवटणे संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत ३२ संघानी सहभाग नोंदविला होता. अंतिम सामना वरवटणे विरुद्ध तळवली या दोन बलाढ्य संघांत झाला. वरवटणे संघाने तीन षटकांत ५० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात तळवली संघाला ३८ धावाच करता आल्या. त्यामुळे ते उपविजेते ठरले. तृतीय क्रमांक गावदेवी रोठ बुद्रुक आणि चतुर्थ रोहा रॉयल्स या संघाने पटकावला. स्पर्धेत मालिकावीर सुशील म्हात्रे, उत्कृष्ट फलंदाज देवश सावंत, उत्कृष्ट गोलंदाज शाकिब सिद्धीकी, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक ओंकार घाग यांना गौरविण्यात आले.

# रोहित-यशस्वी जोडीची द्विशतकी भागिदारी

## दिग्गजांचा २२ वर्षे जुना विक्रम मोडला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिज आणि भारत यांच्यात खेळल्या जात असलेल्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात भारताने आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजचा संघ पहिल्या डावात १५० धावांवर सर्वबाद झाला. त्यानंतर भारताचा कर्णधार रोहित शर्मा आणि युवा फलंदाज यशस्वी जैस्वाल यांनी शतके झळकावली. दोन्ही सलामीवीरांनी पहिल्या विकेटसाठी २२९ धावांची भागीदारी केली. यासह त्यांनी २२ वर्षे जुना विक्रम मोडला.

रोहित-यशस्वी यांनी नंतर संजय बांगर आणि वीरेंद्र सेहवागच्या सर्वात मोठी सलामीच्या भागीदारीचा विक्रम मोडला. २००२मध्ये मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सेहवाग आणि बांगर यांनी डावाची सुरुवात केली आणि २०१ धावांची भागीदारी केली. आणि १३ जुलै रोजी रोहित आणि यशस्वीने मिळून हा विक्रम मोडला.




रोहितने १० चौकार आणि दोन षटकारांसह १०३ धावा केल्या, तर यशस्वीने १४ चौकारांच्या मदतीने नाबाद १४३ धावा केल्या. या शतकी खेळीने दोन्ही सलामीवीरांनी अनेक विक्रम मोडीत काढले. वेस्ट इंडिजच्या भूमीवर शतकी भागीदारी करणारी रोहित-यशस्वी ही २००६नंतर पहिली सलामीची जोडी ठरली. कॅरेबियनमध्ये केवळ चार भारतीय सलामी जोडींनी शतकी भागीदारी केली आहे.

१९७१मध्ये सुनील गावसकर आणि अशोक मांकड यांनी १२३ धावांची नाबाद भागीदारी केली होती. गावसकर यांनी कॅरेबियन मैदानावर अंशुमन गायकवाड यांच्यासोबत शतकी भागीदारीही रचली होती. यानंतर वीरेंद्र सेहवाग आणि वसीम जाफर या सलामीच्या जोडीने २००६ साली मिळून १५९ धावा केल्या होत्या. आता या दोन्ही जोड्यांचा रोहित आणि यशस्वीने मिळून १७ वर्षांचा विक्रम मोडला आहे. यशस्वीने ६१व्या षटकात जेसन होल्डरच्या चेंडूवर चौकार मारून सेहवाग आणि जाफरची भागीदारी मागे टाकत नवा विक्रम केला.

# यशस्वी जैस्वालच्या शतकानंतर ड्रेसिंग रूममध्ये जल्लोष

**डॉमिनिका : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय युवा सलामीवीर यशस्वी जैस्वालने शतक झळकावून अनेक विक्रम केले. जैस्वालने शतक ठोकताच भारताचे प्रशिक्षक राहुल द्रविडपासून ते विराट कोहलीपर्यंत सर्व संघाने ड्रेसिंग रूममध्ये एकच जल्लोष केला. सध्या सोशल मीडियावर हा व्हिडीओ खूप व्हायरल होत आहे.

पदार्पणातच शतक झळकावणारा यशस्वी हा भारताचा १७वा फलंदाज आहे. त्याआधी शेवटच्या पदार्पणाच्या कसोटीत श्रेयस अय्यरने भारताकडून शतक झळकावले होते. त्याने २०२१मध्ये कानपूरमध्ये



न्यूझीलंडविरुद्ध १०५ धावा केल्या होत्या. लाला अमरनाथ हे भारतासाठी पदार्पणाच्या कसोटीत शतक झळकावणारे पहिले भारतीय खेळाडू होते. त्यांनी १९३३मध्ये इंग्लंडविरुद्ध १८८ धावा केल्या होत्या.

यशस्वीबद्दल बोलायचे झाले तर पदार्पणातच शतक झळकावणारा तो तिसरा भारतीय सलामीवीर आहे. शिखर धवनने २०१३मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध मोहालीमध्ये आणि पृथ्वी शॉने २०१८मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध राजकोटमध्ये केले होते. यशस्वीने परदेशी भूमीवर पदार्पण करताना पहिल्याच कसोटीत शतक झळकावून इतिहास रचला. अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय सलामीवीर ठरला आहे. एवढेच नाही तर वेस्ट इंडिजविरुद्ध पदार्पणात शतक झळकावणारा तो तिसरा खेळाडू ठरला आहे.

### सचिन तेंडुलकरकडून कौतुक



**मुंबई** : पदार्पणाच्या कसोटी सामन्यात शतक झळकावणारा भारताचा युवा फलंदाज यशस्वी जैस्वालचे सध्या सर्वत्र कौतुक होत आहे. आता जगातील महान फलंदाज सचिन तेंडुलकरनेही त्याचे कौतुक केले आहे. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने जैस्वालचे कौतुक करताना त्याला शुभेच्या दिल्या.

यशस्वी जैस्वालच्या शानदार शतकानंतर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने एक ट्विट केले आहे, ज्यामध्ये त्याने लिहिले, शाब्बास यशस्वी जैस्वाल, तू तुझ्या करिअरची यशस्वी सुरुवात केली आहेस. रोहित शर्माचे आणखी एक शानदार शतक.’ सचिनने आपल्या ट्विटमध्ये कर्णधार रोहित शर्माचेसुद्धा कौतुक केले आहे.

### पालक, गुरूंना शतक समर्पित

शतकानंतर यशस्वी जैस्वालने भावना व्यक्त करताना म्हटले की, हे शतक माझ्यासाठी खूप खास आहे. माझ्यासाठी, माझ्या कुटुंबासाठी आणि सर्व चाहत्यांसाठी, संघातील सहकारी या सर्वांनी मला खूप साथ दिली. रोहित भाईने ज्यांनी मला मैदानात विश्वास निर्माण केला की मी मोठी खेळी करू शकतो. हा सुरु झालेला माझा प्रवास खूप लांबचा आहे. ज्यांनी मला कोणत्याही प्रकारची आतापर्यंत मदत केली त्या प्रत्येकाचे मी आभार मानू इच्छितो. एवढंच मी म्हणेन की मी ज्या परिस्थितीतून आलो आहे त्यात माझ्या पालकांचा आणि गुरूंचा खूप मोठा वाटा आहे हे शतक मी त्यांना समर्पित करू इच्छितो.
















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com